## हत्येप्रकरणी आजन्म कारावास

**रायगड :** गोळीबार आणि हत्या प्रकरणातील आरोपीला आजन्म कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. अलिबाग मधील सत्र न्यायालयाने हा आदेश मंगळवारी झालेल्या सुनावणीत दिला. अलिबाग तालुक्यातील कुरूळ येथील टेकडीवरील ही घटना होती. समीर उर्फ लालदेव चव्हाण असे आरोपीचे नाव आहे. त्याला साठ हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग तालुक्यातील कुरूळ येथील टेकडीवर असलेल्या जंगलात जितेंद्र मगर आणि त्याचे सहकारी •> पान २ वर

# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६
किंमत ४ ₹

B.com Receptionst
पाहिजे वयाची अट नाही.
अर्जासह समक्ष भेटा.
साई-इन हॉटेल चोंढी,
अलिबाग-रेवस रोड अलिबाग

**वेधक**

## पनवेलमध्ये १ कोटींचे अंमली पदार्थ जप्त

**पनवेल :** पनवेल परिसरात अमली पदार्थ तस्करीविरोधात नवी मुंबई पोलिसांनी केलेल्या धडक कारवाईमुळे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे. तळोजा येथील घोटकॅम्प परिसरात सोमवारी दुपारी करण्यात आलेल्या कारवाईत पोलिसांनी अमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या दोन तरुणांना अटक करून सुमारे एक कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे पंजाब येथून तळोजा परिसरात होणाऱ्या अमली पदार्थ तस्करीचे पुन्हा एकदा धागेदोरे समोर आले आहेत. नवी मुंबई पोलिसांनी गेल्या दोन वर्षांत अमली पदार्थप्रकरणी सुमारे २०० गुन्हे दाखल करून जवळपास ९६ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, अमली पदार्थ सेवन करणाऱ्यांविरोधातही मोठ्या प्रमणावर कारवाई •> पान २ वर

## विमान कोसळले; सात जणांचा मृत्यू

**रांची :** झारखंडमधील रांचीहून दिल्लीकडे जाणारे रेड बर्ड एव्हिएशनचे एअर मेडिकल ॲम्बुलन्स विमान चतरा आणि लातेहार सीमावर्ती भागात भीषण दुर्घटनेत कोसळले. या दुर्घटनेत दोन पायलट, एक डॉक्टर, रुग्ण आणि इतर सहप्रवासी मिळून एकूण सात जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली आहे. रुग्णाला उपचारासाठी नेत असताना घडलेल्या या घटनेने हवाई वैद्यकीय सेवांच्या सुरक्षिततेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. प्रशासन तपास करत आहे. दुकानातील शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत जखमी झालेल्या संजय कुमार यांना रांचीतील रुग्णालयात उपचार सुरू होते.

## कार अपघातात दाम्पत्याचा मृत्यू

**पैठण:** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यात भरधाव वेगात असलेली स्विफ्ट कार चालकाचा ताबा सुटल्याने कालव्यात कोसळली. या दुर्घटनेत कारमधील पती-पत्नी पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात उतरलेला एक तरुणही बेपत्ता झाला आहे. चालक मात्र प्रसंगावधान राखत बाहेर पडल्याने बचावला असून तो जखमी अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत आहे. पुलाजवळ रस्त्याचा अंदाज न आल्याने कार थेट कालव्यात गेल्याची प्राथमिक माहिती आहे.अपघातावेळी कारमध्ये चालक अल्ताफ पठाण, मुखीद शेख आणि त्यांची पत्नी निलोफर शेख असे तिघेजण प्रवास करत होते.

## कार- रिक्षा अपघातात ५ जखमी

**महाड:** महाड दापोली राज्य मार्गावर शिरगाव गावच्या हद्दीत कार व रिक्षा यांच्यात अवघड वळणावर झालेल्या अपघातात कारमधील तीन व रिक्षातून प्रवास करणारे दोन प्रवासी जखमी झाले असून जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. कार दापोलीकडून महाडकडे येत होती. त्याचवेळी महाड कडून आंबिवली गावाकडे रिक्षा जात असताना अवघड वळणावर समोरासमोर झालेल्या धडकेमध्ये कार व रिक्षामधून प्रवास करणारे मनीष वाजे, रुचिता गायकर तर कारमधील अमोल पवार, रमेश पवार, नागेंद्र प्रसाद असे एकूण पाच प्रवासी जखमी झाल. या जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले आहे.


# पेण धोक्यात



## भोगावती नदीपात्रात बेकायदेशीर भराव, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे पूरस्थितीचा धोका

**। पेण । प्रतिनिधी ।**

**पेणकरांची जीवनवाहिनी समजली जाणाऱ्या भोगावती नदीच्या पात्रामध्ये गेल्या दोन-तीन वर्षात अनधिकृतरित्या भराव टाकून मोठया प्रमाणात बांधकाम सुरू आहे. पेण शहराची जीवनवाहिनी मानली जाणारी भोगावती नदी सध्या अतिक्रमण आणि बेकायदेशीर भरावाच्या विळख्यात सापडली असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे भविष्यात मोठ्या पूरस्थितीचा धोका निर्माण झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. महसूल विभाग, जलसंपदा विभाग आणि नगरपालिका प्रशासन यांचे या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून भुंडया पुलापासून ते पायथ्यापर्यंत नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर भराव टाकून अनधिकृत बांधकामे उभी राहत आहेत. स्थानिकांच्या मते, या बांधकामांची संख्या शंभराच्या पुढे गेली आहे. एकेकाळी विस्तीर्ण असलेले नदीपात्र आज ठिकठिकाणी अरुंद झाले असून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडवला जात आहे.त्यामुळे भविष्यात पेण शहर पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.**



असे झाल्यास मोठ्या प्रमाणावर जनजीवन विस्कळीत होऊ शकते. एकेकाळी भुंडया पुलाकडून धावत्याकडे जाणाऱ्या रस्त्यापर्यंत नदीपात्र पसरलेले होते. आज अनेक ठिकाणी भराव टाकून तेच पात्र संकुचित करण्यात आले आहे. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, नदीचा नैसर्गिक प्रवाह रोखणे म्हणजे भविष्यातील आपत्तीला निमंत्रण देणे होय. पूरस्थिती निर्माण झाल्यास याच अतिक्रमणधारकांकडून प्रशासनालाच जबाबदार धरले जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, काही नागरिकांनी महसूल विभाग आणि अतिक्रमण करणाऱ्यांमध्ये आर्थिक हितसंबंध असल्याचा संशय व्यक्त केला आहे. मात्र कोणीही उघडपणे पुढे येण्यास तयार नाही. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

पेणचे तहसीलदार तानाजी शेजाळ यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला. मात्र नायब तहसीलदार प्रसाद कालेकर यांनी तलाठ्यांना तातडीने पाहणीसाठी पाठवितो, •> पान २ वर

भुंडया पुलाजवळील तरणखोप स्मशानभूमी परिसरात पूर्वी मोठे आणि मोकळे नदीपात्र होते. मात्र आज त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकून रुंदी कमी करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी नव्याने बांधकामे उभी राहिल्याचे स्पष्ट दिसते. काही भराव अलीकडच्या काही महिन्यातच टाकण्यात आल्याचे स्थानिक सांगतात. जानेवारी महिन्यापर्यंत ज्या भागात नदीपात्र मोकळे होते, त्या ठिकाणी आज मातीचे ढिगारे आणि बांधकाम साहित्य दिसत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### तातडीने होणार पाहणी

पेणचे तहसिलदार तानाजी शेजाळ यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता संपर्क झाला नाही. परंतु नायब तहसिलदार प्रसाद कालेकर यांना तातडीने तलाठ्यांना पाहणी करण्यासाठी पाठवतो असे सांगितले.

स्थानिकांच्या आरोपानुसार, हे काम बहुतांश वेळा रात्रीच्या अंधारात केले जाते. त्यामुळे प्रश्न उपस्थित होतो की, महसूल खात्याचे तलाठी, मंडळ अधिकारी किंवा जलसंपदा विभागाचे कर्मचारी यांना हे दिसत नाही का? इतक्या मोठ्या प्रमाणावर नदीपात्रात बदल होत असताना प्रशासन अनभिज्ञ कसे राहू शकते, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

गेल्या दोन-तीन वर्षांत थोडा जरी पाऊस झाला तरी भुंडया पुलावरून पाणी जाण्याच्या घटना घडल्या आहेत. यावर्षी नव्याने बांधलेल्या पुलावरूनही पाणी गेल्याचे समोर आले आहे. नदीपात्र अरुंद झाल्यामुळे पाण्याचा वेग आणि पातळी वाढत असून भविष्यात मुसळधार पावसात पाणी नदीपात्र सोडून वस्तीभागात शिरण्याची भीती व्यक्त होत आहे.

**आरसीएफ रेल्वे मार्गावर**

# भांडवलदारांचे अतिक्रमण?




**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

तालुक्यातील मुशेत गाव सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. थळ येथील (आरसीएफ) प्रकल्पाच्या रेल्वे मार्गिकेजवळ सुरू असलेल्या बांधकामामुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते संजय सावंत यांनी यासंदर्भात आरसीएफचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आणि रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे •> पान २ वर

### ग्रामपंचायतीच्या सूचना धाब्यावर

या प्रकरणात स्थानिक प्रशासन आक्रमक झाले. ग्रामपंचायत मापगांवच्या प्रशासकाने यापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. ग्रामपंचायतीच्या माहितीनुसार, मुशेत येथील गट क्र. १११/अ/१/९ मध्ये बांधकाम सुरू आहे. •> पान २ वर

### अनेक प्रश्न अनुत्तरीत

दरम्यान, या प्रकरणात संबंधित बांधकाम कंपनीची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. तसेच प्रशासनाकडूनही ठोस प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. त्यामुळे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. नियम पाळले गेले आहेत का? अंतर मोजणी अधिकृतरीत्या झाली आहे का? परवानग्या कोणत्या अटींवर देण्यात आल्या? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रेल्वे •> पान २ वर

## ई-रिक्षांच्या बंदचा विद्यार्थ्यांना फटका

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

श्रमिक रिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे आणि त्यांना ई-रिक्षा समर्थकांनी साथ दिल्यामुळे खऱ्या अर्थाने हा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. ई-रिक्षाच्या सेवेमुळे इथे पर्यटन मोठ्या प्रमाणावर वाढले असून सर्वांनाच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. मात्र ९४ परवानाधारक असताना केवळ वीस ई-रिक्षा देण्यात आल्याने दि.२३ फेब्रुवारीपासून ई-रिक्षाचालकांनी •> पान २ वर



# शिलार धरणाला विरोध

## शेतकरी एकवटले, जनहित याचिका दाखल



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कशेळे भागात चिल्हार नदीवर धरण बांधले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने मे २०२५ मध्ये हे धरण मंजूर केले असून या धरणाला शेतकऱ्यांनी प्रखर विरोध केला आहे. या धरणाविरोधात स्थानिक शेतकऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. तर धरण रद्द व्हावे, यासाठी हजारो शेतकरी कर्जत तहसील कार्यालयात मोर्चा घेऊन जाणार आहेत. याशिवाय वेळ पडल्यास कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रोखण्याचा निर्धार शेतकऱ्यांच्या बैठकीत करण्यात आला.

तालुक्यातील चिल्हार नदीवर शिलार येथे धरण बांधले जाणार आहे. ग्रामीण भाग असणाऱ्या शिलार धरण प्रकल्पात पाच गाव तसेच येथील •> पान २ वर

**रेवस-करंजा खाडी पूल प्रकल्प**

# मार्च २०२८ उजाडणार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत उभारण्यात येत असलेल्या रेवस-करंजा खाडी पुलाच्या कामाला प्रत्यक्ष गती मिळाली असून, प्रकल्पाचे सुमारे २५ टक्के काम पूर्ण झाले आहे. मुंबई आणि कोकणाला थेट जोडणारा हा महत्त्वाकांक्षी दुवा येत्या डिसेंबर २०२६ पर्यंत ५० टक्के पूर्ण करण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. मार्च २०२८ पर्यंत पूल वाहतुकीसाठी खुला करण्याचा शासनाने निर्धार केला आहे.

रेवसतेरेड्डीसागरीमहामार्गातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात असून, करंजा-रेवस खाडीच्या मध्यभागी २.४ किलोमीटर लांबीचा मुख्य पूल उभारला जात आहे. याशिवाय दोन्ही बाजूंना प्रत्येकी

- **मुंबई-कोकण दुवा मजबूत होणार**
- **अंतर कमी अन् वेळही वाचणार**

चार किलोमीटर, असे एकूण आठ किलोमीटर लांबीचे जोडरस्ते आणि पूल बांधले जाणार आहेत. सध्या खाडीत १२ ते १३ पिअर उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे. सुमारे दोन हजार ४७८ कोटी रुपयांच्या खर्चातून हा प्रकल्प साकारत आहे.

या मार्गाची घोषणा १९८० मध्ये झाली होती; मात्र विविध कारणांमुळे

### अंतरात मोठी बचत

रेवस-करंजा खाडी पूल पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते अलिबाग प्रवासासाठी लागणारे अंतर व वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, कोकणातील पर्यटन, उद्योग आणि दळणवळणाला मोठी चालना मिळणार आहे.

प्रकल्प रखडला होता. आता प्रत्यक्ष काम सुरू झाल्याने कोकणातील वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या पुलामुळे जेएनपीए ते अलिबाग हे अंतर ५५ किलोमीटरवरून थेट ३० किलोमीटरपर्यंत कमी होणार असून, पेण-पनवेलचा लांबचा फेरा टळणार आहे.

करंजा येथील चाणजे महसूल हद्दीतील जमीन •> पान २ वर

# ८९ ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचना जाहीर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक नुकतीच पार पडली. आता ग्रामपंचायतीच्या निवडणुकांवर लक्ष लागून राहिले आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ८९ ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामुळे आता ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे वेध लागले असून लवकरच या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचा बिगुल वाजण्याची शक्यता आहे.

मागील तीन वर्षाहून अधिक काळ महानगरपालिका, नगरपरिषद व जिल्हा परिषद, पंचायतीवर प्रशासकीय राजवट होती. प्रदिर्घ कालावधीनंतर नगरपरिषद, महानगर पालिकांच्या निवडणुका झाल्या. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका पार पडल्या. आता ग्रामपंचायत निवडणुकांवर लक्ष लागून राहिले आहे. रायगड जिल्ह्यातील ८९ ग्रामपंचायतीची मुदत जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीत संपणार आहे. त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील सासवणे, पेझारी, वाघोडे, मानतर्फे झिराड.

पेण तालुक्यातील काळेश्री, बोर्झे, वाकरूळ, खारपाले, कामार्ली, आंबेघर, जोहे.पनवेल तालुक्यातील बारवई, साई, सावळे, खानाव, वलप, आकुर्ली, हरिग्राम, खैरवाडी, नानोशी, पोसरी, खानावले, उमरोली, आपटा, पालीदेवद, कोळखे, सांगुर्ली,मोर्बे, उसर्ली खुर्द, पाले बुद्रुक, देवळोली, केवाळे, वाकडी, वाजे, वारदोली.

### ग्रामपंचायतींवर दृष्टीक्षेप

| | |
|---|---|
| अलिबाग | ०४ |
| पेण | ०७ |
| पनवेल | २४ |
| उरण | ०६ |
| कर्जत | ०९ |
| रोहा | २१ |
| माणगांव | ०५ |
| महाड | ०६ |
| म्हसळा | ०३ |
| श्रीवर्धन | ०४ |
| एकूण | ८९ |

### ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचा बिगुल वाजणार



उरण तालुक्यातील चाणजे, केगांव, नागाव, म्हातवली, फुंडे,वेश्वी. कर्जत तालुक्यातील कोल्हारे, जिते, पोशिर, साळोख तर्फे वरेडी, हुमगांव, कडाव, वैजनाथ, भिवपूरी, दामत. रोहा तालुक्यातील रोठ बुद्रूक, रोख खुर्द, तळाघर, घोसाळे, शेणवई, धामणसई,मालसई, महाळुंगे, शेडसई, तिसे, वरसे, वरवठणे, खांब, पळस, कोंडगाव, ऐनघर, चिंचवली तर्फे दिवाळी, वाशी, वावे पोटगे, गोवे, निडी तर्फे अष्टमी.

माणगांव तालुक्यातील बामणोली, देवळी, लोणेरे, लाखपाले, टेमपाले. महाड तालुक्यातील नरवण, भेलोशी, मांडले, आसनपोई, •> पान २ वर

**नागालँड सहकार विभागाने केले कौतुक | वरिष्ठ अधिकाऱ्यांची अभ्यास भेट**

# 'आरडीसीसी' सहकार क्षेत्रातील नवा आदर्श

**। रायगड । प्रतिनिधी ।**

भारत सरकारच्या ॲक्ट ईस्ट पॉलिसी अंतर्गत उत्तर-पूर्व भारताला दक्षिण-पूर्व आशिया खंडासमवेत मुख्यभूमी मार्गाने जोडण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. विशेषतः नागालँड,मणिपूर व इतर सीमावर्ती राज्ये ही भारताची गेट वे टू एशियन म्हणून विकसित करण्याचा केंद्राचा दृष्टिकोन आहे. या पार्श्वभूमीवर मजबूत, तंत्रज्ञानाधारित आणि पारदर्शक सहकारी बँकिंग व्यवस्था उभारणे अत्यावश्यक मानले जात आहे.

याच उद्देशाने नागालँडमधील सहकारी



क्षेत्रामधील १० वरिष्ठ अधिकारी आणि संचालकांच्या समितीने रायगड जिल्हा सहकारी बँकेच्या प्रगत आयटी प्रणाली, संस्था संगणकीकरण व व्यवसाय विविधीकरणाच्या अनुभवाचा अभ्यास केला. मुख्यभूमी कनेक्टिव्हिटीच्या वाढत्या संधींचा लाभ घेण्यासाठी उत्तर-पूर्व सहकारी बँकिंग क्षेत्राला आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्याची दिशा या भेटीतून स्पष्ट झाल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.या भेटीत त्यांनी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांच्याशी सखोल चर्चा केली. यावेळी बँकेचे प्रशासन विभाग प्रमुख अजित भगत, कर्ज विभाग प्रमुख संजीव देशमुख, आयटी प्रमुख नीलेश कदम, अकाऊंट विभाग प्रमुख महेंद्र माळी, गजानन हावरे, संदेश पाटील, राजेंद्र जुईकर हे उपस्थित होते. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला नाबार्ड तपासणीत अ वर्ग दर्जा प्राप्त झाला असून महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये हा मान मिळवणारी ती एकमेव बँक •> पान २ वर

# 'समृद्धी महामार्गावर ११५० कोटींचा महाघोटाळा'



**। मुंबई । पतिनिधी ।**

समृद्धी महामार्गाच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप माजी आमदार अंबादास दानवे यांनी केला. हा समृद्धी नव्हे तर लुटालुटीचा महामार्ग आहे, असे म्हणत त्यांनी सुमारे ११५० कोटींचा घोटाळा झाल्याचा दावा केला. या घोटाळ्यात सत्ताधारी पक्षाच्या एका बड्या खासदाराच्या चालकाचा थेट संबंध असल्याचे •> पान २ वर

### बड्या खासदाराच्या चालकाचा समावेश?

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक दावा करताना दानवे म्हणाले, या महापापात सत्ताधारी पक्षाच्या एका बड्या खासदाराच्या चालकाचा हात आहे. हा चालक केवळ प्यादा आहे की यामागे एखादा मोठा वजीरफद्दडलाय? या प्रश्नामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून संबंधित खासदार कोण, असा प्रश्न विचारला जात आहे. हा सरकारी तिजोरीवर टाकलेला दरोडा असून या प्रकरणाची तात्काळ सीआयडी चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी दानवे यांनी केली आहे. दोषींना तात्काळ तुरुंगात धाडले पाहिजे, असेही त्यांनी सरकारला ठणकावून सांगितले आहे.

# वाळु उत्खनन विरोधात शेकाप आक्रमक

## ■ मंजुरी प्रकरणांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची रामदास जराते यांची मागणी

**। गडचिरोली । प्रतिनिधी ।**

खासगी शेत जमीनीमध्ये पुरामुळे वाळुचा थर जमा झाल्याचे दाखवून हजारो ब्रास वाळू उत्खनन केले जात आहे. वाळू उत्खनन परवानगीच्या नावाखाली गैरफायदा घेऊन कोट्यावधींच्या काळाबाजाराचा गोरखधंदा सुरु असल्याचा आरोप शेकाप नेते रामदास जराते यांनी केला आहे.

गडचिरोली तालुक्यासह मौजा साखरासह जिल्ह्यात हा प्रकार सुरु असल्याचा प्रकार त्यांनी उघड केला आहे. या खासगी शेतजमिनीमधील वाळू उत्खनन मंजूरी प्रकरणांची राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या मार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या आदिवासी, भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रामदास जराते यांनी केली आहे.

महसूल व वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्याकडे केलेल्या तक्रारीत नुसार रामदास जराते यांनी सांगितले आहे की, खासगी शेतजमिनीमध्ये पुरामुळे जमा झालेल्या वाळूचे निष्कासन करण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार गडचिरोली जिल्ह्यात दरवर्षी अनेक शेतकऱ्यांना खनिकर्म कार्यालयाकडून वाळू उत्खनन आणि विक्रीची परवानगी देण्यात येते.

पुरामुळे नापीक झालेल्या शेतजमिनीला उत्पादन योग्य करण्याच्या सद्हेतूने ही तरतूद शासनाने केलेली आहे. मात्र गडचिरोली जिल्ह्यात अलीकडच्या काळात नदीकाठावरील खासगी शेतजमिनीचे खसरे जोडून वाळू उत्खननाची मिळालेल्या परवानगीच्या आडून हजारो ब्रास वाळू उपसून कोट्यवधींच्या उलाढाली करण्याचे काही लोकांनी व्यवसाय सुरू केले आहेत. हा गोरखधंदा राजरोसपणे सुरू आहे.

गडचिरोली तालुक्यातील साखरा गावात मागील ६-७ वर्षांपासून एकाच कुटुंबातील मंडळीच्या शेतात दरवर्षी वाळू येते. शासनाकडून त्यांना हजारो ब्रास वाळू उत्खननाची परवानगी मिळते.

### अधिकाऱ्यांशी हातमिळवणी

गडचिरोली जिल्ह्यात काही मोजके वाळू, रेती व्यवसायिक खासगी शेतीमध्ये जमा झालेल्या वाळूच्या व्यवसायात गुंतले असून विशिष्ट अधिकाऱ्यांना हाताशी धरून कोट्यवधी रुपयांच्या उलाढाली करत आहेत. खाजगी शेतजमिनींच्या वाळू घोटाळ्यातून शेकडो कोटींच्या शासकीय महसुलाला चुना लावण्याचे काम या तथाकथित खासगी शेतजमीन धारकांनी केले असल्याच आरोप रामदास जराते यांनी केला आहे.

सातत्याने वाळूचा उपसा या कुटुंबाकडून होत आहे तर ते पिके घेतात कधी? आणि कोणत्या हंगामाचे पिके घेतात? असा प्रश्न जराते यांनी उपस्थित केला आहे. साखरा गावात वारंवार एकाच व्यक्तीच्या शेतात वाळू जमा होतो. त्यामुळे हा प्रकार संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

# संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त कारागृहात जनजागृती

**। रायगड । प्रतिनिधी ।**

संत गाडगे महाराज जयंती निमित्त विविध ठिकाणी स्वच्छता अभियान तसेच समाजप्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याचाच एकभाग म्हणून अलिबाग जिल्हा कारागृहात दाखल असलेल्या बंद्यांकरीता स्वच्छते विषयी जनजागृती निर्माण व्हावी याकरीता जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला.

डॉ. मिलींद पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना समाज सुधारण्याचे चळवळीमध्ये थोर समाजसेवक संतगाडगेबाबा यांचे विसाव्या शतकात मोलाचे योगदान होते यांची जाणीव बंद्यांना करुन दिली. तसेच संतगाडगे महाराज यांनी स्वच्छतेचे ध्येय हाती घेवून त्यांनी गावागावात जावून समाजातील लोकांना स्वच्छतेचे महत्व पटवून दिले.

थोर समाजसेवक संतगाडगेबाबा यांनी समाजात असलेल्या वाईट चालीरिती, परंपरा, अज्ञान, अंधश्रध्दा, अस्वच्छता दुरकरण्याकरीता कीर्तनाचे माध्यमातून प्रबोधनकरुन समाज सुधारण्याचे कार्य केले. तसेच स्वत:च्या मनाची, शरीराची व आपण राहत असलेल्या परिसराची स्वच्छता करणेबाबत बंद्यांना मार्गदर्शन केले.

पान १ वरून

## हत्येप्रकरणी आजन्म कारावास

रात्री पार्टी करायला गेले होते. मध्यरात्री ते आपली पार्टी आटपून घराच्या दिशेने परत निघाले. टेकडीवरून उतरत होते. ३१ मार्च २०१९ रोजी रोजी रात्री दबा धरून बसलेले राजेंद्र मगर आणि त्याचे साथीदारांनी पिस्तुलातून गोळीबार सुरु केला. यात सागर पाटील आणि मागे बसलेला गौरव भगत हे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान सागरचा मृत्यू झाला. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. अलिबागचे तत्कालीन पोलीस निरीक्षक के.डी. कोल्हे या प्रकरणाचा तपास करत होते.वडिलोपार्जित जमिनीच्या वादातून सख्या भावाने आपल्या मित्रांच्या मदतीने हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलीसांनी तपास करून आरोपींविरोधात दोषारोप पत्र अलिबाग येथील सत्रा न्यायालयात दाखल केले होते. या प्रकरणाची सुनावणी अलिबाग येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश -३ संतोष भगत यांच्या न्यायालयात झाली. सरकारी अभियोक्ता म्हणून जिल्हा सरकारी वकील संतोष पवार यांनी या प्रकरणात काम पाहीले. यात फिर्यादी, गोळीबारात जखमी झालेला साक्षीदार, तपासिक अमंलदार यांची साक्ष महत्त्वाच्या ठरली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सरकारी अभियोक्ता पवार यांचा युक्तिवाद ग्राह्य धरला. आणि आरोपी समीर उर्फ लालदेव चव्हाण यास आजन्म कारावास आणि ६० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.

## भांडवलदारांचे अतिक्रमण?

लेखी तक्रार करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. सावंत यांच्या तक्रारीनुसार, आरसीएफ आणि जिल्हाधिकारी रायगड यांच्या अटींनुसार रेल्वे मार्गिकेपासून कोणत्याही प्रकारचे बांधकाम किमान ३० मीटर अंतरावर असणे बंधनकारक आहे. मात्र, मुशेत येथे क्षितीज बिल्डकॉन कंपनीने एम.आर. कंपनीसाठी थेट रेल्वे मार्गिकेपासून अवघ्या ५ ते १० मीटर अंतरावर आरएमसी प्लांट आणि इतर मोठी बांधकामे सुरू केली आहेत. थळ आरसीएफ हा देशातील महत्त्वाचा औद्योगिक प्रकल्प मानला जातो. येथे येणारी कच्चा माल व खतांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर रेल्वेमार्गे केली जाते. अशा परिस्थितीत रेल्वे मार्गिकेजवळ अवजड यंत्रसामग्री, काँक्रीट मिक्सिंग प्लांट आणि सततची वाहनांची ये-जा सुरू असल्यास भविष्यात अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. रेल्वे रुळांजवळील जमिनीची हालचाल, कंपने आणि मातीची धूप यामुळे मार्गिकेच्या स्थैर्यावर परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. आता सर्वांचे लक्ष आरसीएफ प्रशासन आणि जिल्हा यंत्रणेच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे. नियमांचे पालन होणार की प्रभावशाली घटकांच्या दबावाखाली प्रकरण दडपले जाणार, यावरच या वादाचा पुढील प्रवास ठरणार आहे.

### ग्रामपंचायतीच्या सूचना धाब्यावर

कामासाठी येणाऱ्या अवजड वाहनांमुळे सार्वजनिक रस्त्यांची पूर्णपणे वाट लागली असून साईडपट्ट्या खचल्या आहेत. ग्रामपंचायतीने १७ ऑक्टोबर २०२५ आणि १५ डिसेंबर २०२५ रोजी दोनदा नोटीस देऊनही संबंधित कंपनीने कामात कोणताही बदल केलेला नाही. ग्रामपंचायतीच्या सूचनांनंतरही काम सुरूच राहिल्याने स्थानिकांमध्ये नाराजी वाढत आहे. ग्रामस्थांमध्ये नाराजी अवजड वाहनांच्या रहदारीमुळे परिसरातील सार्वजनिक रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. रस्त्यांच्या साईडपट्ट्या खचल्या असून धूळ आणि आवाजामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दैनंदिन प्रवासी यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. विकासाच्या नावाखाली आमच्या सुरक्षिततेशी खेळ केला जात आहे, असा संतप्त सूर ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

### अनेक प्रश्न अनुत्तरीत

मार्गिकेची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कोणती पावले उचलली जात आहेत? थळसारख्या संवेदनशील औद्योगिक परिसरात अशा प्रकारचे आरोप उघडकीस येणे ही गंभीर बाब मानली जात आहे. मोठा अपघात घडल्यानंतर हालचाल करण्याऐवजी प्रशासनाने आधीच कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## पेण धोक्यात

असे सांगितले. प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्यात येणार का आणि दोषींवर कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भोगावती संवर्धन प्रेमी संघटनांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, वेळेत कारवाई न झाल्यास ते रस्त्यावर उतरतील. आज कारवाई झाली नाही तर उद्या पूरस्थितीत फक्त नुकसान मोजावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.

## शिलार धरणाला विरोध

शेतकरी बाधीत होणार आहेत. या धरणाला विरोध करण्यासाठी पाथरज ग्रामपांचयतमधील किकवी गावाजळ एका फार्मऊसमध्ये या संदर्भात बैठक घेण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते. सरकारने शिलार धरण मंजुर केले. मात्र स्थानिक शेतकऱ्यांना या धरण प्रकल्पासंदर्भात कोणत्याही प्रकारे माहिति देण्यात आली नाही. हा प्रकल्प मंजुर झाल्यापासुन येथील स्थानिक कार्यकर्ते दिनेश रसाळ यांनी किकवी येथील सर्व शेतकरी व प्रकल्प बाधीत यांना एकत्र घेऊन चर्चा केली. याप्रकरणात शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली आहे. तरीदेखील संबंधित कंपनी व ठेकेदारांनी शेतकऱ्यांना विचारात न घेता कामाला सुरुवात केली. अखेर शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत काम बंद केले. या धरणाच्या परिसरात असलेल्या सर्व ग्रामपंचायतींनी धरणाला विरोध करणारे ठराव केले असून धरण व्हावे, यासाठी सरकार करीत असलेल्या धोरणाबद्दल निषेध व्यक्त केला आहे.

## ८९ ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचना जाहीर

बिरवाडी, कोकरे तर्फे नाते. श्रीवर्धन तालुक्यातील कोलमांडले, कारिवणे, गालसुरे, दिघी, पाभरे, केल्टे, लिपणीवावे या ग्रामपंचायतीचा समावेश आहे.या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्याची सुरुवात २० फेब्रुवारीपासून झाली आहे. तहसीलदार यांनी गुगल अर्थचे नकाशे गावांचे अंतिम नकाशे केले आहेत. २७ फेब्रुवारीला तलाठी, ग्रामसेवक यांनी संयुक्त स्थळ पाहणी करून प्रभाग पाडणे, सीमा निश्चित करणे. तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली समितीने प्रारूप प्रभाग रचनेची तपासणी करणे. प्रभाग रचनेचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांना मान्यतेसाठी पाठविणे. प्रारुप प्रभाग रचनेची तपासणी करून त्यात आवश्यक असल्यास दुरुस्ती करणे. त्यानंतर राज्य निवडणूक आयोग अथवा प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविणे. प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविणे. प्रभाग रचना अंतिम करणे आदी प्रक्रिया राबविली जाणार आहे. ही प्रक्रिया ४ मेपर्यंत असणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## समृद्धी महामार्गावर ११५० कोटींचा महाघोटाळा

दानवे म्हणाले. माजी आमदार अंबादास दानवे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करून अंबादास दानवे आरोप केले. दानवे यांनी विचारले आहे की, १९८५ मध्ये जन्मलेल्या व्यक्तीच्या नावे १९७१ मध्ये २३ एकर जमीन बक्षीस म्हणून कशी काय मिळू शकते? हा निव्वळ जादूचा प्रकार आणि भ्रष्टाचार असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.जमिनीची अदलाबदल केवळ ३ एकर जमिनीच्या बदल्यात २३ एकरचा मोबदला लाटण्याचे कारस्थान रचल्याचे दानवे यांनी म्हटले आहे.भ्रष्टाचाराचा कळस म्हणजे मृतांच्या नावावर कागदपत्रांची फेरफार करून सरकारी तिजोरीवर दरोडा टाकण्यात आला असल्याचे दानवे यांनी म्हटले आहे.

## पनवेलमध्ये १ कोटींचे अंमली पदार्थ जप्त

करण्याचे आदेश नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी दिल्याने प्रत्येक पोलीस ठाण्यात दिवसाला एक तरी अमली पदार्थ सार्वजनिकरित्या सेवन करणाऱ्याला पकडून त्याच्या कारवाई केली जाते. यामुळे; काही अंशी का होईना सार्वजनिक ठिकाणी अमली पदार्थ सेवनावर नियंत्रण आले आहे. अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांचे पथकाला गुप्त बातमीदारामार्फत महावीर मॅजेस्टी, घोट कॅम्प, तळोजा येथे सुरींदर सिंग उर्फ काळु तसेच त्याचा भाऊ मनिंदर सिंग असे हेरॉईन या अंमली पदार्थाची विक्री करतात व त्यांचे राहते घरी त्यांनी अंमली पदार्थाचा साठा करून ठेवला असल्याची अशी खात्रीलायक बातमी मिळाली होती. याबाबत खात्री करून कारवाई केली. मिळालेल्या बातमीप्रमाणे पोलीस पथक व पंच असे ल खबरीतील ठिकाणी जावुन एनडीपीएस कायद्यात असलेल्या तरतुदींनुसार छापा कारवाई करून पंजाब येथुन आलेल्या सुरींदर गुरुजंत सिंग उर्फ काळु , मनिंदर गुरुजंत सिंग यांच्या ताब्यातुन एकुण ११८ ग्रॅम वजनाचा हेरॉईन व १४३.६ ग्रॅम अफिम असा एकुण १ कोटी २ लाख ,१९,५०० रूपये मुद्देमाल बेकायदेशिररित्या विक्री करीता स्वत: चे कब्जात बाळगले असताना मिळुन आले. सुरींदर गुरूजंत सिंग उर्फ काळु, मनिंदर गुरुजंत सिंग व ट्रक ड्रायव्हर यांच्याविरुध्द तळोजा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास तळोजा पोलीस ठाणे करत आहे. सदरचे कारवाई मध्ये सहा. पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे, अति. कार्यभार, आर्थिक गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सपोनि तुषार माने, पोहवा तायडे, पोहवा मेहेतर, मपोना पाटील, पोशि पालवे, चालक पोशि भाबड हे सहभागी होते.

## ई-रिक्षांच्या बंदचा विद्यार्थ्यांना फटका

बेमुदत बंद पुकारला आहे. याचा परिणाम शालेय विद्यार्थी, दिव्यांग, रुग्ण, येणाऱ्या पर्यटकांना सहन करावा लागत आहे. एकीकडे रुग्णवाहिकेचा गैरवापर होऊ नये, असे सांगण्यात येते आणि दुसरीकडे शासकीय अधिकारी आरामात मोफत सुविधेचा उपभोग घेत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांमधून प्रशासनाच्या भोंगळ कारभाराबाबतीत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अधिकारी वर्गावर अंकुश ठेवण्यासाठी गावात कुणी सक्षम लोकप्रतिनिधी नाहीत का? असाही प्रश्न स्थानिकांना सतावत आहे.सलग दुसऱ्या दिवशी सुध्दा ई-रिक्षा बंद असल्याने याचा पर्यटनावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. ही सुविधा बंद असल्यामुळे बाजारात शुकशुकाट दिसून येत आहे. ई-रिक्षाच्या संख्येत वाढ करावी, असे सर्वोच्च आदेश दिलेले असताना देखील अकार्यक्षम सनियंत्रण समिती जाणूनबुजून या श्रमिकांना नाहक त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या समितीला बरखास्त करून टाका. अन्यथा ई-रिक्षाच्या वाढीसाठी आम्हाला आमरण उपोषण करावे लागेल, असे महिला वर्गाकडून सांगण्यात आले आहे.

## मार्च २०२८ उजाडणार

संपादनाला स्थानिक ग्रामस्थांनी विरोध दर्शवला आहे. द्रोणागिरी पर्वताच्या पायथ्याशी रस्ता नेल्यास उत्खननामुळे पर्यावरण व ऐतिहासिक डोंगराला धोका निर्माण होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. मार्गाचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याची मागणी करण्यात आली आहे.

## 'आरडीसीसी' सहकार क्षेत्रातील नवा आदर्श

ठरली आहे, सोबतीला मजबूत आर्थिक शिस्त, पारदर्शक लेखापद्धती व सक्षम जोखीम नियंत्रण ही या यशामागील प्रमुख कारणे आहेत. बँकेने आयटी क्षेत्रात मोठी झेप घेत कोअर बँकिंग सोल्युशन मोबाईल बँकिंग ॲप, एसएमएस अलर्ट, एटीएम रुपे कार्ड व सारख्या डिजिटल सेवा प्रभावीपणे राबवल्या आहेत. जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा संस्थांचे संगणकीकरण पूर्ण करणारी देशातील पहिली जिल्हा बँक बनून डिजिटल खाते व्यवस्थापन, ऑनलाईन कर्ज वितरण-वसुली व सदस्य डेटाबेस प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. बँकेने कृषी कर्जापुरते मर्यादित न राहता लघुउद्योग, गृहनिर्माण, वैयक्तिक व व्यापारी कर्ज तसेच ठेवी वाढ व गुंतवणूक योजनांद्वारे व्यवसाय विविधीकरण साधण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांमुळे रिअल-टाईम व्यवहार, पारदर्शकता व कार्यक्षमता या सर्व बाबींविषयी नागालँडच्या अधिकाऱ्यांना आवश्यक,माहितीपूर्ण व व्यावहारिक शिक्षण मिळाल्याचे त्यांनी समाधानाने नमूद केले, शिवाय बँकेने ३१ जानेवारी २०२६ अखेर आपला व्यवसाय ७३५० कोटीपर्यंत नेल्याबद्दल बँकेचे कौतुक केले. याभेटीदरम्यानआयोजितचर्चासत्रातदोन्हीराज्यांतीलसहकारीबँकिंगव्यवस्थेमधील साम्य व आव्हाने यावर चर्चा झाली. नागालँडच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रायगड डीसीसी बँकेच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त करत, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांच्याकडे उत्तर-पूर्व भारतातील सहकारी बँकिंग क्षेत्राच्या विकासासाठी हे मॉडेल उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.तसेच बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील आणि संचालक मंडळ यांनी नागालँड आणि ईशान्य भारतामधील सहकारी संस्थांना भेट देवून मार्गदर्शन करण्याची विनंती केली. दोन दिवसांच्या या भेटीमध्ये बँकेचे केंद्र कार्यालय, विविध शाखा आणि सहकारी संस्था या ठिकाणी या सर्व अधिकाऱ्यानी भेटी दिल्या, यावेळी बँकेचे सीनियर मॅनेजर संदीप जगे यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. रायगड डीसीसी बँकेने तंत्रज्ञान, पारदर्शकता व बहुआयामी व्यवसाय मॉडेलच्या आधारे सहकारी क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे. नागालँडमध्येही अशाच सुधारणांद्वारे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देता येईल, असे मत या भेटीच्या दरम्यान नागालँड राज्य सहकारी बँकेचे वरिष्ठ संचालक इंझीयेम्बा लोंगकुमेर यांनी नोंदविले.

# औषधसाठा नियमित करण्याची मागणी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

शहरात महिन्याला ३५० पेक्षा अधिक श्वान दंश होत आहेत. त्यासाठी लागणारे अँटी रेबीज औषधांचा अपुरा पुरवठा होत आहे. त्यासाठी दर आठवड्याला जिल्हा रुग्णालयातून औषधांची मागणी करावी लागत आहे. या महत्त्वपूर्ण औषधांचा नियमित व पुरेसा पुरवठा नागरिकांना करण्यात यावा, अशी मागणी केली जात आहे.

उरणच्या इंदीरा गांधी ग्रामीण रुग्णालयात श्वान दंशानंतर लागणारे अँटी रेबीज औषधे आणि धनुर्वात प्रतिबंध औषधांचा तुडवडा निर्माण झाला होता. या अत्यावश्यक औषधांसाठी रुग्णांना प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे औद्योगिक व प्रगत म्हणून गणल्या जाणाऱ्या तालुक्यातील रुग्णांना असुविधांबरोबरच औषध तुटवड्याचाही सामना करावा लागत आहे.

न परवडणाऱ्या खाजगी रुग्णालयामुळे सर्वसामान्य नागरिकांनी उरणच्या इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात गर्दी होऊ लागली आहे. विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी दररोज ३०० पेक्षा अधिक रुग्ण येत आहेत. ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उरणमध्ये ३५ वर्षांपूर्वी उभारण्यात आलेल्या ३० खाटांचे इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय आणि कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र या दोन ठिकाणी वैद्यकीय सुविधा पुरविणारी यंत्रणा आहे. ही यंत्रणा अपुरी पडत आहे. उरणच्या इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात अनेक असुविधा आहेत. त्यासाठी येथील उद्योग आणि खाजगी व्यवसायीक यांच्या मदतीवर अवलंबून रहावे लागत आहे. उरण तालुक्यात सुसज्ज असे शासकीय रुग्णालय उभारावे, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे. त्यासाठी आंदोलन ही उभारले आहे.

## वेदक विद्यामंदिरास अ प्लस श्रेणी

**तळा :** गो. म. वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत बाह्य मूल्यांकनात अ प्लस श्रेणी प्राप्त करून राज्यातील गुणवत्तापूर्ण शैक्षणिक संस्थेमध्ये शाळेने आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. राज्यातील ४२९ शाळा व रायगड जिल्ह्यातील १० शाळांना अ+ श्रेणी प्राप्त झाली असून त्यामध्ये गो.म.वेदक कनिष्ठ महाविद्यालयातील उच्चविद्याविभूषित शिक्षक वर्ग व गुणवत्ता पूर्ण शैक्षणिक वातावरण यामुळेच वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयास अ प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे.



## श्री वीरेश्वर मंदिरात शिवरायांचे चित्र अर्पण

**। महाड । प्रतिनिधी ।**

इतिहासप्रेमी यश घरटकर यांनी वीरेश्वर महाराज मंदिर येथे शिवरायांचे भव्य चित्र अर्पण केले. हे चित्र छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयामध्ये जतन केलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूळ चित्रावर आधारित आहे. ऐतिहासिक संदर्भ, आणि संशोधनाच्या आधारे हे चित्र साकारले आहे.

कापडावर ॲक्रेलिक रंगांमध्ये साकारलेले हे चित्र महाराजांच्या राजस आणि ऐश्वर्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवते. चित्रात छत्रपती शिवाजी महाराज डाव्या हातात त्यांचे आवडते शस्त्र यशवंत नावाचा पट्टा आणि उजव्या हातात भवानी तलवार धारण केलेल्या तेजस्वी मुद्रेत उभे असल्याचे दर्शविण्यात आले आहे.

# महाराजस्व समाधान शिबीर कार्यक्रम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रोहा तहसिलदार कार्यालयामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान कार्यक्रमांतर्गत ७ मार्च कोलाड, १४ मार्च नागोठणे, १० एप्रिल चणेरा,१४ एप्रिल निडी तर्फे अष्टमी, १७ एप्रिल घोसाळे, १ मे निडी तर्फे अष्टमी तसेच ८ व १५ मे रोजी सकाळी ११.०० वा. नगर परिषद रोहा येथे शिबीर कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसिलदार डॉ. किशोर देशमुख यांनी केले आहे. या शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार निकाली काढणे, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती करणे, भोगवटदार वर्ग २ जमिनी भोगवटदार वर्ग १ मध्ये रूपांतर करणे, आधार कार्ड, जातीचे दाखले, रहिवासी दाखले, वय अधिवास दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्डची सर्व कामे, जेष्ठ नागरिक दाखले, सांगयो, इगायो, फॉर्म भरून ज्यांचे वय वर्ष १८ पूर्ण झालेले आहेत अशा मतदारांचे नवीन मतदान ओळखपत्र बनविण्याकामी फॉर्म भरून घेणे तसेच या शिबिरादरम्यान विविध योजनेसाठी लाभार्थींनी अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देणार आहे. सद्य परिस्थितीत नागरिकांना लागणारे विविध दाखले या शिबिरात देण्यात येणार आहेत.


**ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा**

**ता. माणगाव, जि. रायगड**

नोटीस बोर्ड प्रसिद्ध दि. १८/२/२०२६

**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि. २७/०२/२०२६ सकाळी १२.०० वा. पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय मोर्बा येथे सादर करावे.

| अ.क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | महादपोली आदिवासीवाडी अंतर्गत रस्ता (२०२५-२६) | १५ वा वित्त आयोग | २००००० | ३ महिने |
| २ | महादपोली बौद्धवाडी स्मशानभूमीचे सुशोभिकरण (२०२५-२६) | १५ वा वित्त आयोग | १५०००० | ३ महिने |
| ३ | सर्फराज अहमद जळगावकर ते अ लतीफ अब्दल्ला धनसे यांच्या घरापर्यंतचा रस्ता (२०२५-२६) | १५ वा वित्त आयोग | ३००००० | ३ महिने |
| ४ | बोर्ले अंतर्गत गटार बांधकाम करणे (२०२४-२५) | १५ वा वित्त आयोग | ९४९१८ | ३ महिने |
| ५ | भीमनगर रोहिदासवाडी अंतर्गत गटार बांधकाम करणे (२०२५-२६) | १५ वा वित्त आयोग | १२३००० | ३ महिने |
| ६ | बोर्ले बौद्धवाडी अंतर्गत गटार बांधकाम करणे (२०२५-२६) | १५ वा वित्त आयोग | १००००० | ३ महिने |
| ७ | भीमनगर डोंगरपायऱ्या बांधकाम करणे (२०२४-२५) | १५ वा वित्त आयोग | ५०००० | ३ महिने |
| ८ | पऱ्याची मोरी पूर्व भागास काँक्रिटीकरण व खोलीकरण करणे (२०२४-२५) | १५ वा वित्त आयोग | ३००००० | ३ महिने |
| ९ | सुर्ले आदिवासीवाडी अंतर्गत गटार बांधणे (२०२४-२५) | १५ वा वित्त आयोग | १००००० | ३ महिने |
| १० | मागासवर्गीय वस्तीत समाजमंदिर दुरूस्ती करणे (मोर्बा बौद्धवाडी) (२०२४-२५) | १५ वा वित्त आयोग | ५०००० | ३ महिने |
| ११ | डंपिंग ग्राऊंडला संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे (२०२५-२६) | १५ वा वित्त आयोग | ३६०००० | ३ महिने |
| १२ | महादपोली आदिवासीवाडी स्मशान चौथरा बांधणे (२०२५-२६) | ग्रामनिधी | १११२२० | १ महिने |
| १३ | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन करणे (२०२२-२३) | १५ वा वित्त आयोग | २००००० | १ महिने |
| १४ | शाळांना पाणी सुविधा करणे (२०२२-२३) | १५ वा वित्त आयोग | १००००० | १ महिने |
| १५ | मोर्बा शाळा शौचालय व इतर दुरूस्ती (२०२३-२४) | १५ वा वित्त आयोग | १००००० | १ महिने |
| १६ | शाळा अंगणवाडी रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे (२०२३-२४) (२०२५-२६) | १५ वा वित्त आयोग | २३१४१६ | १ महिने |
| १७ | महादपोली आदिवासीवाडी समाजमंदिर दुरूस्ती करणे | ग्रामनिधी | १००००० | १ महिने |
| १८ | महादपोली गाव महिला शौचालय पाणी सुविधा व इतर दुरूस्ती (२०२४-२५) | १५ वा वित्त आयोग | ७५००० | १ महिने |
| १९ | मोर्बा बौद्धवाडी मागासवर्गीय वस्तीत समाजमंदिर दुरूस्ती (२०२५-२६) | १५ वा वित्त आयोग | १०७३९४ | १ महिने |
| २० | मोर्बा अंतर्गत गटार बांधणे (२०२२-२३) | १५ वा वित्त आयोग | ४००००० | १ महिने |

**अटी व शर्ती -**

१) प्राप्त निविदा दि. २७/०२/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता ग्रा. पं. मोर्बा येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.

२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच मोर्बा यांनी राखून ठेवला आहे.

३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रक्कमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सा़ो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे पदाधिकारी/सदस्य यांचेमार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.

४) कामाचे देयकातून शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा**
**ता. माणगाव, जि. रायगड**

# श्रीवर्धनमध्ये कायद्याची पायमल्ली

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

**श्रीवर्धन शहरात सध्या अक्षरशः कायद्याची पायमल्ली सुरू असून प्रशासन पूर्णपणे निष्क्रिय झाल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. थेट सरकारी रस्ता अडवून बेकायदेशीर काम सुरू असल्याची तक्रार महेश सायगांवकर यांनी केली आहे. तसेच, अपंग व्यक्तींना तहसील कार्यालयात 'फुकट काम केले जात नाही', अशा स्वरात वागणुक मिळत असल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे. याबाबत तक्रारी दाखल होऊनही संबंधित प्रशासन व स्थानिक लोकनेते गप्प असल्याचा संताप नागरीकांनी व्यक्त केला आहे.**

- **बेकायदेशीर बांधकामाचा धुमाकूळ**
- **तहसील कार्यालयात अयोग्य वागणूक**
- **महेश सायगांवकर यांचे आरोप**

श्रीवर्धन येथील सोमजाई मंदिर समोरील सावकार वाचनालयापासून सोनार आळीपर्यंत थेट सरकारी रस्ता अडवून बेकायदेशीर काम सुरू असल्याची गंभीर तक्रार समोर आली आहे. या कामामुळे मुख्य बाजाराकडे जाणारा रस्ता अडला असून परिसरात दररोज भीषण वाहतूक कोंडी होत आहे. महेश सायगांवकर यांच्यासह स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, नवनिर्वाचित नगरसेवक व नगराध्यक्ष याच रस्त्यावरून ये-जा करत असतात. त्यामुळे ते जाणीवपूर्वक याकडे डोळेझाक करत आहेत. निवडणुकीदरम्यान त्यांचा 'वाहतुक कोंडी' हा प्रमुख मुद्दा होता; मात्र, सत्तेत आल्यानंतर तोच प्रश्न पूर्णपणे विसरले आहेत, अशी टीका होत आहे. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाला थेट आव्हान देत म्हटले आहे की, गरीब माणसाने घर बांधताना ५ फूट जागा सोडली नाही तर लगेच टेप घेऊन मोजमाप केले जाते. मग याच प्रकरणात नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनी स्वतः येऊन रस्त्याचे मोजमाप करून दाखवावे. याचवेळी स्थानिक लोकनेत्यांवरही नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. निवडणुकीत विविध ठिकाणी कार्यालये उघडली जातात, विकास कामांची घोषणा करत नारळ फोडले जातात; परंतु, गोरगरिबांच्या प्रश्नांवर कितीवेळा आमसभा घेतल्या? गेल्या २० वर्षांत किती वेळा लोकांसमोर खुली चर्चा झाली? असा सवाल देखील नागरिकांनी उपस्थित केला आहे.

तसेच, दुसऱ्या एका घटनेचा उल्लेख करताना महेश सायगांवकर यांनी सांगितले की, तहसील कार्यालयात दोन्ही पायांनी अपंग व्यक्तीशी अयोग्य भाषेत बोलण्यात आले. 'येथे फुकट काम करत नाही', अशा स्वरातील वागणूक मिळत असल्याचा आरोप त्यांच्याकडून करण्यात आला आहे. श्रीवर्धनमधील अनेक सरकारी कार्यालयांमध्ये नागरिकांना अशीच वागणूक मिळत असल्याची तक्रार आहे. ही सर्व परिस्थिती पाहता नागरिकांमध्ये संताप तीव्र होत असून, प्रशासन दखल घेत नसेल तर जनतेनेच व्हिडिओ शूटिंग करून पुरावे गोळा करायला सुरुवात केली पाहिजे, अशी भूमिका महेश सायगांवकर यांनी मांडली आहे.

> श्रीवर्धन शहरात कायद्यापेक्षा पैशाचे राज्य चालते का? संबंधित प्रशासन नेमके कोणाच्या दबावाखाली आहे? बेकायदेशीर रस्ता अडवून काम करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई होईल का? या प्रश्नांची उत्तरे आता नागरिक मागत आहेत. प्रश्नांची योग्य उत्तरे न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडू. आज संबंधित प्रकरणी पोलीस ठाणे, तहसील कार्यालय आणि नगरपालिकेत अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली आहे. तरीदेखील प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, ही बाब संतापजनक आहे.
>
> – महेश सायगांवकर, तक्रारदार

### लोकनेत्यांचे दुर्लक्ष

श्रीवर्धन शहरात आधीच अरूंद रस्ते आहेत. त्यातच आता रस्ता अडवून अनधिकृत बांधकामे केली जात आहेत. या ठिकाणी पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे येथील नागरिकांना मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडीचा सामना करावा लागत आहे. मात्र, याकडे लोकनेत जाणिवपुर्वक दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहे.

# मुरूडमधील गारंबी धरण उपेक्षित



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड-जंजिरा पर्यटनात निसर्ग सौंदर्यात भर घालणारे नबाब कालीन ऐतिहासिक गारंबी धरण उपेक्षित असल्याचे समोर येत आहे. या ठिकाणी स्वच्छता अभियान राबवुन सुशोभीकरण करून ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिकांमधून जोर धरत आहे.

- **नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी लक्ष पुरवणे गरजेचे**
- **वारसा जपण्यासाठी योग्य उपाययोजना करण्याची मागणी**

गारंबी धरण हे अनेक वर्षे मुरुड शहराला पाणीपुरवठा करत आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून मुरुडला खार आंबोली धरणातून पाणी पुरवठा होत असल्याने या नबाब कालीन धरणाकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. याठिकाणी नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्यावतीने दरवर्षी पावसाळ्यापूर्वी स्वच्छता अभियान राबविण्यात येते. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर श्रीसदस्य सहभागी होऊन स्वच्छता केली जाते. मात्र, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नगरपरिषदेच्या संबंधित अधिकारी वर्गाने यात लक्ष पुरवून मुरुड-जंजिरा पर्यटनातील हा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांमधून होत आहे.

## निवडक



### आक्षी शाळेतील विद्यार्थ्यांचा गौरव

अलिबाग तालुक्यातील आक्षी येथील जिल्हा परिषद शाळेत संयुक्त सभा मंगळवारी (दि.२४) पार पडली. या सभेत विविधा विषयांवर चर्चा झाली. तसेच, या सभेदरम्यान या शाळेतील विद्यार्थ्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल त्यांना गौरविण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. आक्षी येथील जिल्हा परिषद शाळेच्या सभागृहात शाळा व्यवस्थापन समिती, विशेष सुरक्षा, माजी विद्यार्थी संघ यांची संयुक्त सभा मंगळवारी घेण्यात आली. यावेळी व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा समिधा गोंधळी, आक्षीच्या सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, पोलीस पाटील नेहा नाईक, नंदकुमार नाईक, ॲड. प्रदिप नाईक, ग्रामपंचायत सदस्य निरजा नाईक यांच्यासह अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालक, माजी विद्यार्थी, विद्यार्थी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेमध्ये शाळेबाबत विविध विषयांवर चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला गती देण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम घेण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. तसेच, या शाळेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या परीक्षा, स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धांमध्ये त्यांनी घवघवती यश संपादन केले. त्यामुळे या सभेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणवंत पुरस्काराने गौरव करण्यात आला.




### नियोजनाअभावी कचराकुंड्या गंजल्या

**माथेरान :** माथेरानमध्ये एकीकडे स्वच्छतेचा बोजवारा उडालेला असताना आवश्यक ठिकाणी कचराकुंड्या लावण्याची गरज असताना मागील काळात प्रशासकीय राजवटीत नव्याने आणलेल्या कचराकुंड्या येथील शास्त्री हॉलच्या आवारात गंजत पडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी दिसून येत आहे.पर्यटन नगरी माथेरानमध्ये बाराही महिने पर्यटकांची रेलचेल मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यांच्या जवळ असणाऱ्या सुका कचरा यामध्ये प्लास्टिक बाटल्या, खाद्यपदार्थांची पाकिटे आणि अन्य कचरा टाकण्यासाठी विविध पॉईंटस भागात कचराकुंड्या नसल्याने हा सर्व कचरा जंगलात विखुरलेल्या अवस्थेत दिसून येत आहे. मागील काळात प्रशासकीय राजवटीत नविन कचराकुंड्या मागविल्या होत्या; मात्र, त्या नगरपरिषदेच्या नियोजनाअभावी आवश्यक ठिकाणी लावण्यात आलेल्या नाहीत. त्या माथेरान शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या शास्त्री हॉल आणि हुतात्मा स्मारक या ठिकाणी पडून आहेत. त्यामुळे आता त्या गंजु लागल्या असून लवकरच त्यांचा वापर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्या भंगारात जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### खांदेश्वरातील जगन भोई बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून एक व्यक्ती हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. जगन रघुनाथ भोई असे या व्यक्तीचे नाव असून रंग गोरा, चेहरा उभट, नाक परसट, अंगाने पातळ, डोळे काळे, केस लाल काळे, अंगात हाफ गुलाबी काळ्या पिवळ्या रंगाचा टि-शर्ट, समोरिल बाजुस गणपतीचा फोटो तसेच त्यावर ओम साई गणेश मित्र मंडळ सायदे बोरीची वाडी असे लिहलेले आहे. तसेच, पांढऱ्या रंगाची जिन्स पँट, डाव्या हातात घड्याळ, पायात काळ्या रंगाची चप्पल घातली असून त्याला मराठी आणि कातकरी भाषा अवगत आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा पोशि कोळी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## ट्रेलरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

ट्रेलरने दुचाकीला दिलेल्या धडकेत राहुलकुमार श्यामनारायण मिश्रा याचा मृत्यू झाला. या अपचाताप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यातकंटेनरट्रेलरचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, राहुल कुमार हा त्याच्या दुचाकीने देना बँक तळोजा एमआयडीसी येथून कल्याणकडे जाणाऱ्या रस्त्याने जात होता. तो हिं डालको कंपनीसमोर आला असता याठिकाणी येणाऱ्या भरधाव ट्रेलरचालकाने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत राहुलकुमार याचा जागीच मृत्यू झाला.

# विवेक बुद्धी जागृत ठेवून काम कराः बी.एच. गायकवाड

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

भारतीय बौद्ध महासभेच्या माध्यमातून २४ शिबीरे घेतली जातात. त्याचाच एक भाग म्हणजे व्यक्तीमत्व विकास शिबीर हा आहे. या शिबिराच्या माध्यमातून स्वतची बौद्धीक प्रगती साधण्याबरोबरच व्यक्तीमत्व विकास वाढीला देखील चालना मिळते. त्यामुळे बौद्धीक क्षमता वाढविण्यासाठी वाचन महत्वाचे आहे. प्रत्येकाने वाचन करून स्वतःची बौद्धीक क्षमता वाढविण्यावर भर देणे आवश्यक आहे. विवेक बुद्धी जागृत ठेवून काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव बी.एच. गायकवाड यांनी केले.



भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा (उत्तर)आयोजित मोहपाडा येथे रविवारी (दि.२२) व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण सभासद नोंदणी मोहिम उद्घाटन आणि जनगणना २०२६ मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख ॲड. एस.एस. वानखेडे, जिल्हाध्यक्ष सुशील वाघमारे, सरचिटणीस प्रकाश सोनावळे, कोषाध्यक्ष राजेंद्र बावस्कर, संस्कार उपाध्यक्ष संतोष जाधव आदी मान्यवरांसह जिल्हा, तालुका शाखेच पदाधिकारी, सभासद व महिला उपस्थित होत्या. यावेळी मार्गदर्शन करताना बी.एच. गायकवाड म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीमध्ये समय सुचकता असणे गरजेचे आहे. त्यांचे नेतृत्व धोरणात्मक निर्णय घेणारे व सर्वांना संघटीत करणारे नेतृत्व असावे. सर्वांप्रती मैत्री भावना असणे गरजेचे आहे. आपल्या कर्तव्याचे भान ठेवून कार्य करणे आवश्यक आहे. दुरदृष्टी ठेवून काम करण्याबरोबरच दिशा देणारे कार्य केल्यास समाजाला ते प्रेरणादायी ठरणारे आहे. नितीमत्ता, सामाजिक बांधीलकी, प्रभावी वकृत्व, कल्पकता, कार्यक्षम दुरदृष्टीपणा व नेतृत्व हे व्यक्तीमत्व विकास वाढीसाठी मोलाचे ठरणारे आहे, असे गायकवाड म्हणाले. त्यानंतर केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख ॲड. एस.एस. वानखेडे यांनी उद्दीष्ट पूर्तता, संकल्प, क्षमता, गतिशिलता, सुसंघटना आदी मुद्यांवर मार्गदर्शन करून उपस्थितांना संबोधित केले.

# ओरियन मॉलमध्ये पोलिसांचे मॉकड्रिल

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील ओरियन मॉल येथे आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्याच्या दृष्टीने व्यापक मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. संभाव्य दहशतवादी हल्ला, आग किंवा अन्य आपत्तीजन्य परिस्थितीत समन्वय साधत तत्काळ प्रतिसाद देण्याची क्षमता तपासण्यासाठी ही रंगीत तालीम घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यात वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोलीस निरीक्षक, ८ अंमलदार, बीट मार्शल १, २ व ३ वरील अंमलदार, क्यूआरटी पथकाचे २९ अंमलदार, एटीसीचे २ अंमलदार, सुरक्षा शाखेचा १ अधिकारी, झोन ३ स्ट्राइकिंग पथकासह १ अधिकारी व ८ अंमलदार, विशेष शाखेचे २ अंमलदार तसेच एटीएसचा १ अंमलदार यांचा सहभाग होता.




## रिक्षा कलंडल्याने प्रवासी जखमी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तळोजा फेस २ येथील सुनौल दहिफळे (२७) यांनी आरएएफ सिग्नल येथूनन धानसरला जाणारी शेअरिंग रिक्षा पकडली. यावेळी रिक्षाचालक भरधाव वेगाने रिक्षा चालवत असताना, वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही रिक्षा रस्त्यावर उलटी होऊन अपघात झाला. या अपघातात दहिफळे रस्त्यावर पडले व रिक्षा त्यांच्या पायावर पडून ते जखमी झाले. त्यानंतर ही रिक्षा बाजूला करण्यात आल्यावर रिक्षाचालक रिक्षा घेऊन पळून गेला. या प्रकरणी पुढील तपास तळोजा पोलीस करीत आहेत.

# बेलापूरकरांचा वसंतोत्सव उत्साहात

## निसर्गप्रेमींसाठी एक अनोखी पर्वणी

**राजेश डांगळे**

**। पनवेल ।**

सीबीडी बेलापूर येथील सेक्टर ९ मधील रहिवाशांच्या पुढाकारातून सुमारे १ हेक्टर क्षेत्रफळात ॲग्रो गार्डनची निर्मिती करण्यात आली आहे. अतिउच्च दाबाच्या वीजतारांखालील मोकळ्या जागेचे रूपांतर भाज्या, फळझाडे, फुलपाखरांसाठी उपयुक्त फुलझाडे आणि वनौषधींनी नटलेल्या हिरव्या बागेत करण्यात आले आहे. नुकताच या गार्डनमध्ये यंदाचा 'वसंतोत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. हा उत्सव निसर्गप्रेमींसाठी एक अनोखी पर्वणी ठरत आहे.

या कार्यक्रमाला दुपारी दोन वाजता सुरुवात झाली. निसर्गपूरक वस्तूंचे स्टॉल्स, स्थानिक उद्योजकांनी उभारलेले खाद्यपदार्थांचे स्टॉल्स, मातीच्या वस्तू बनवण्याच्या कार्यशाळा, निसर्ग छायाचित्रण, अनवट नृत्यप्रकार, भरतकाम, तसेच मोकळ्या गवतात बसून चित्रकलेचे उपक्रम यामुळे वातावरण रंगले होते. अर्बन स्केचर्स संस्थेने परिसराचे निरीक्षण करून निसर्गचित्रे साकारली. वृक्ष व निसर्ग वाचनासाठी विशेष फेरफटका आयोजित करण्यात आला होता. प्रवेशद्वारावर उभारलेल्या आकर्षक बांबूच्या कमानींमुळे उत्सवस्थळाची शोभा अधिक खुलून दिसत होती. संध्याकाळी ॲग्रो गार्डनमधील 'तारांगण' या खुल्या रंगमंचावर लहान मुलांनी ड्रम वादन सादर केले. तर, गुणी गायकांनी सुरेल गायनाने रसिकांची मने जिंकली. वन्यवाणी संस्थेतर्फे सादर करण्यात आलेल्या 'ए बिबट' या भारुडातून लोकजागृतीचा प्रभावी संदेश देण्यात आला. त्यानंतर नवी मुंबई ड्रम सर्कलच्या जोशपूर्ण वादनावर उपस्थितांनी ताल धरत उत्सवाचा आनंद द्विगुणित केला. सामूहिक सहभाग, निसर्गाविषयीची जाणीव आणि सांस्कृतिक रंगत यांचा संगम साधत यंदाच्या वसंतोत्सवाची उत्साहात आणि यशस्वी सांगता झाली.



# वाहतूक शाखेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात संशयास्पद हालचाली आढळून आल्याने वाहतूक पोलिसांनी एका कारची तपासणी केली. त्यात बेकायदेशीर पिस्तूल आढळून आले आणि ते जप्त केले. तसेच, दुसऱ्या कारवाईत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे केलेल्या वाहन तपासणीत एका दुचाकीच्या डिकीतून गांजा जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत पनवेल वाहतूक शाखेचे वपोनि औदुंबर पाटील, पीएसआय जीवन शेरखाने, पोह आमिर मुलाणी, युवराज येळे, पोना राकेश राजपूत, पोकाँ महेंद्र बुट्टे यांनी सक्रिय सहभाग घेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



**गरजू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे दार खुले | ३ हजार १४६ विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश**

# जिल्ह्यात आरटीई प्रवेश सुरु

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत (आरटीई) २५ टक्केप्रवेश सुरु करण्यात आल आहे. या प्रवेशासाठी जिल्ह्यातील २६९ शाळांची निवड करण्यात आली असून ३ हजार १४६ विद्यार्थ्यांना या नियमाप्रमाणे प्रवेश मिळणार आहे. त्यासाठी स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आली आहे.

अर्ज भरण्याची प्रक्रिया १७ फ ब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत सुरू असणार आहे. पालकांनी https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावर अर्ज भरायचे आहेत. आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसाठी पालकांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. वंचित घटकांतील बालकांमध्ये अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), (क), (ड) इतर मागासवर्ग (ओबीसी), विशेष मागासवर्ग (एसबीसी), आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक, एचआयव्ही बाधित किंवा प्रभावित बालक, अनाथ बालके, दिव्यांग बालके अथवा कोविड प्रभावित बालकांचा समावेश होतो. आर्थिक वर्षामध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न १ लाखापेक्षा कमी आहे, अशा बालकांचा आर्थिक दुर्बल गटामध्ये समावेश होतो. बालकांच्या पालकांना त्यांच्या निवासस्थाच्या ठिकाणापासून एक किलोमीटरपेक्षा कमी अंतरावरील शाळा आरटीई पोर्टलवर दिसतील. या अनुषंगाने प्रक्रियेकरिता विचारपूर्वक १० शाळांची निवड करण्यात यावी, इत्यादी सूचना देण्यात आल्या आहेत.



### अर्ज भरताना ही प्रक्रीया राबवावी

अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे जोडण्यात यावीत, अचूक माहिती भरण्यात यावी, तसेच विहित मुदतीमध्ये परिपूर्ण अर्ज भरला जाईल, याची दक्षता घ्यावी. प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही समस्या असल्यास आरटीई पोर्टलवर मदत केंद्रांची माहिती देण्यात आली आहे. त्यांच्याशी संपर्क करुन समस्येचे निराकरण करता येईल, असे शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

## देवजी शरण आला, पण..

या देशातील नक्षलवाद येत्या ३१ मार्चच्या आत समाप्त करण्याचे उद्दिष्ट अमित शाह यांनी ठरवून दिलेले असल्याने पोलिस व प्रशासन यंत्रणेची लगबग सुरु दिसते. गेल्या वर्षभरात अनेक चकमकींमध्ये नक्षलवाद्यांना मारण्यात आले. आता राहिलेले लोक शरण यावेत असे प्रयत्न चालू दिसतात. यासाठी आधीच शरण आलेल्यांमार्फत त्यांच्याशी संपर्क साधला गेलेला दिसतो. नक्षलवाद्यांचा सध्याचा सर्वात मोठा नेता व म्होरक्या देवजी आणि अन्य १६ नक्षली रविवारी तेलंगणा पोलिसांपुढे शरण आले. आता या चळवळीत फार कोणी शिल्लक राहिलेले नाही. गणपती हा यांचा जुना नेता अजूनही गायब आहे. पण वय आणि प्रकृतीमुळे त्याने स्वतःच आधीच निवृत्ती घेतली होती व पदावरून बाजूला झाला होता. तो आता सक्रीय होण्याची शक्यता नाही. त्याला तरुण पाठीराखे मिळणेही सध्याच्या काळात कठीण आहे. त्यामुळे अगदी ३१ मार्चपूर्वी नाही, तरी येत्या वर्षभरामध्ये ही चळवळ नाम शेष होईल अशी शक्यता दिसते. देवजी हा करीमनगर जिल्ह्यातल्या दलित समाजातून आलेला नेता होता. अत्यंत कडवा व लढाऊ अशी त्याची प्रतिमा होती. महाराष्ट्राला तर तो विशेष परिचित होता. कारण, १९९१मध्ये गडचिरोलीचे नेते धर्मरावबाबा अत्राम यांचे केलेले अपहरण गाजले होते. त्या दशकभराच्या काळात गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद फोफावण्यात देवजीचा मोठा हात होता. त्यातच देवजीची नक्षलवादी असलेली बायको सृजनाक्का पोलिस चकमकीत मारली गेली होती. त्यामुळे संतापलेल्या देवजीने धानोरा तालुक्यात बरीच जाळपोळ केली होती. तेव्हापासून गडचिरोली पोलिस व त्याचे मोठे वैर होते. पण नंतर तो छत्तीसगड व इतर भागात स्थलांतरीत झाला होता. दंतेवाडामध्ये जवानांच्या ताफ्यावर हल्ला करून ७६ जणांना मारण्याची घटना २०११ मध्ये घडली होती. हे सगळे देवजी व नंबाला केशव उर्फ बसवराजू याचे नियोजन होते. त्यातील केशव याला गेल्या वर्षी मे महिन्यात पोलिसांनी मारले. तो नक्षलवादी चळवळीला मोठा हादरा होता. केशव हा वारंगळच्या इंजिनिअरिंग कॉलेजचा हुशार विद्यार्थी होता. त्यामुळे नक्षली चळवळीतही त्याचा दबदबा होता. पण तोच मारला गेल्याने चळवळीचा कणा मोडला गेला. आता देवजीही शरण आल्याने तिच्यातली उरलीसुरली जानही संपणार आहे.

### चळवळीच्या जन्माची कारणे

यापूर्वी भूपती हा आणखी एका बडा नक्षली नेता गेल्या ऑक्टोबरात शरण आला होता. तो गडचिरोलीत राहून सध्या सरकार व नक्षली यांच्यात दुवा म्हणून काम करीत असावा अशी शक्यता आहे. कारण, नक्षल्यांचे नवे नेते कोण, ते सध्या कोणत्या भागात कार्यरत आहेत इत्यादी माहिती भूपतीकडे असते असे दिसते. शिवाय मागे राहिलेल्यांनीही आता शरण यावे, आपला जीव वाचला तर आपण बाहेर राहूनही चळवळ करू शकतो असे भूपती सर्वांना सांगत आहे. मी हिंसक मार्ग सोडले असले तरी माझी लढाई संपलेली नाही असेही तो म्हणत असतो. एका अर्थाने हा अजूनही खांद्यावर बंदुका घेऊन जंगलात फिरणाऱ्यांना संदेश आहे व तो योग्यही आहे. सद्य स्थितीमध्ये सुरक्षा दलांनी चारही बाजूंनी हल्ला चढवलेला आहे. एकूणच चळवळीची ताकद कमी झालेली आहे. अशा वेळी जंगलात राहून जीव गमावण्यापेक्षा शरण येऊन बाहेरून क्रांतीसाठी जमतील ते प्रयत्न करणे हाच रास्त मार्ग आहे. मात्र, या शरण आलेल्यांना मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी काय प्रयत्न केले जाणार हा खरा कळीचा मुद्दा आहे. क्रांती ही बंदुकीच्या गोळीतूनच जन्माला येते या माओच्या वचनावर श्रध्दा ठेवून इतकी वर्षे सैनिकांप्रमाणे लढलेल्या या नक्षली कार्यकर्त्यांना आता नागरी समाजात वावरणे कितपत व कसे शक्य होईल हा औत्सुक्याचा विषय आहे. दुसरीकडे छत्तीसगड, तेलंगणा व महाराष्ट्राचे मागास भाग नक्षलमुक्त झाल्यानंतर तेथे सरकारचे राज्य सुरु होणार आहे. आता नक्षल्यांचा जाच संपून सरकारचा अधिक वाईट त्रास सुरु असा अनुभव त्यांना येता कामा नये. मुळात १९६० च्या दशकामध्ये देशात नक्षलवाद वाढला त्याचे कारणच मुळी आदिवासी व जंगलांच्या भागात वन व महसुली खात्याचा जुलूम हा होता. सरकार व पोलिसांच्या दहशतीला उत्तर म्हणून नक्षल्यांनी बंदुका हाती घेतल्या व आदिवासींनी त्यांना प्रदीर्घ काळ साथ दिली ही वस्तुस्थिती आहे.

### जंगलांमध्ये आता काय होणार?

काळाच्या ओघात निव्वळ हिंसेसाठी हिंसा सुरु झाली. साध्याभोळ्या आदिवासी लोकांवर नक्षली लोकांचा जुलूम सुरु झाला. विशेषतः सरकारचा खबऱ्या असल्याच्या संशयावरून मारून टाकणे हे सर्रास सुरु झाले. त्यातून इकडे सरकार व तिकडे नक्षली अशी आदिवासींची अवस्था झाली. पण याचा अर्थ नक्षलवादाने या आदिवासींना काहीच मिळवून दिले असे होत नाही. या चळवळीने आदिवासींना ताठ मानेने उभे राहण्यास शिकवले. सरकारला झुकवता येऊ शकते हे दाखवले. त्यामुळेच इतकी वर्षे ते जंगलातून आपली लढाई करू शकले व आदिवासींनी त्यांच्या बाबत गुप्तता बाळगली. मात्र आता इंटरनेट व मोबाईलच्या जमान्यात ही गुप्तता राखणे कठीण होते. दरम्यानच्या काळात शिकून मोठ्या झालेल्या आदिवासींना शहरी आयुष्य खुणावू लागले. त्यातूनच सुरक्षा यंत्रणांना इथे शिरकाव करण्यास अवसर मिळाला. आता नक्षली संपल्यानंतर या सर्व प्रदेशांमध्ये सरकारचा विकास नावाचा हातखंडा खेळ सुरू होणार आहे. किंबहुना, गडचिरोलीसारख्या भागामध्ये तर त्या खेळाच्या पूर्वतयारीसाठीच नक्षल्यांच्या नायनाटाची मोहिम राबवली गेली असावी असा संशय आहे. गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये गेल्या काही दिवसांत अदानी, जिंदाल इत्यादींच्या कंपन्यांना प्रचंड खाणकाम तसेच प्रकल्प उभारायला परवानगी दिली गेली आहे. यामुळे या भागातील जंगल तुटणार आहे. अंधारी व्याघ्र प्रकल्पात खाणींना परवानगी देण्याचा निर्णय तर सरकारच्याच हरित लवादाचा आक्षेप डावलून घेण्यात आला. आता न्यायालयानेच त्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून सरकारला नोटीस काढली आहे. अदानीला गडचिरोलीतील प्रचंड लोहखनिज तसेच इतर खनिजे उपसण्यासाठी परवानगी द्यायची आणि ती खनिजे शक्तीपीठ मार्गावरून वाहून नेऊन गोव्यातून निर्यात करायची असा हा भविष्यातला आराखडा आहे. नक्षली चळवळ हाच त्यातला एकमेव अडथळा होता. स्थानिक आदिवासींना आता आंदोलने वा चळवळी करणे कठीण आहे. सरकार त्यांना सहज दडपून टाकण्याच्या स्थितीत आहे. किंबहुना, गडचिरोलीत सध्या रोजच्या रोज हे घडते आहे. १९६० च्या दशकात अशाच दडपशाहीमधून नक्षली चळवळ उभी राहिली. आता ती राहू नये याचा बंदोबस्त सरकारने आधीच केला आहे. अदानी आणि इतर मंडळींचे रक्षणकर्ते ही भूमिका सरकार चोख बजावत आहे. नक्षलवाद्यांचा नेता देवजी किंवा अन्य कोणी शरण येणे किंवा मारले जाणे याचा अर्थ सरकारला जाब विचारणारे कोणीच न उरणे असाही आहे. तो चिंताजनक आहे. आता राजकीय पक्ष व संघटनांनी ही पोकळी भरून काढायला हवी. जंगले, पर्यावरण, खनिजे यांचे रक्षण करायला हवे. कोण्या मूठभरांनी त्यांचा आपसात लिलाव करावा व सरकारचा त्यांना पाठिंबा असावा हे घडता कामा नये.

विचार

# प्रशासनाला बसलेली चपराक

***जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था असलेल्या भारतातील प्रगत महाराष्ट्रात लोक ३२ तास एका ठिकाणी अन्न-पाण्यावाचून अडकून पडतात, ही मोठी नामुष्कीची बाब आहे. आपत्कालीन व्यवस्थेतील सर्व उपाययोजनांचा मुंबई-पुणे रस्त्यावर बळी जातो आणि प्रशासन निमूटपणे त्याकडे पाहत राहते. हे चित्र जगातील चौथ्या क्रमांकांचा अर्थव्यवस्था असलेल्या देशाला शोभादायक नाही. या समस्येवर कशी मात करता येणार?***

महेश जोशी

मुंबई-पुणे महामार्ग म्हणजे महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक जीवनाची नस. दररोज लाखो वाहने, हजारो मालवाहू ट्रक, प्रवासी बस, खासगी गाड्या या मार्गावरून धावतात; पण याच महामार्गावरील बोरघाटात नुकतीच झालेली तब्बल ३२ तासांची वाहतूक कोंडी ही केवळ एक अपघाती घटना नव्हती, तर आपल्या व्यवस्थेतील ढिसाळपणा, नियोजनशून्यता आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेचे जिवंत उदाहरण ठरली. या काळात हजारो नागरिक रस्त्यावर अडकले. लहान मुले, वृद्ध, रुग्ण, गर्भवती महिला, कामगार, विद्यार्थी सगळेच या कोंडीत अडकले. पाणी नाही, अन्न नाही, शौचालयाची सुविधा नाही, वैद्यकीय मदत नाही. मोबाईल चार्जिंगपासून औषधांपर्यंत प्रत्येक गोष्टीसाठी नागरिकांना तडफड करावी लागली. हा केवळ 'ट्रॅफिक जाम' नव्हता, तर मानवी प्रतिष्ठेवरचा आघात होता. प्रशासनाकडून नेहमीप्रमाणे कारणे दिली गेली. अवजड वाहन बिघडले, अपघात झाला. पावसामुळे रस्ता निसरडा झाला, डोंगर उतारामुळे अडथळा निर्माण झाला ही कारणे नवी नाहीत. बोरघाट हा अपघातप्रवण आणि संवेदनशील भाग आहे, हे सर्वांनाच माहिती आहे. मग हे माहीत असूनही पूर्वतयारी का नाही? एखादे वाहन बिघडल्यामुळे ३२ तासांचा जाम होत असेल, तर त्याचा अर्थ तिथे तत्काळ बचावयंत्रणा, क्रेन, पर्यायी मार्ग व्यवस्थापन, ट्रॅफिक कंट्रोल सिस्टीमच नाही. म्हणजे हा व्यवस्थेचा अपघात होता. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, महामार्ग विस्तार, फ्लायओव्हर, टनेल यावर कोट्यवधी रुपये खर्च झाले. इतक्या महत्त्वाच्या मार्गावर आपत्कालीन व्यवस्थापन सक्षम नसेल, तर हा विकास लोकांसाठी आहे की ठेकेदारांसाठी, असा प्रश्न उपस्थित होतो.

बोरघाटात एक रसायने वाहतूक करणारा टँकर उलटला. त्यातील वायूगळती होऊन लोक दगावू नयेत, म्हणून वाहतूक थांबवली गेली. हे योग्यच होते; परंतु अपघात झाल्यानंतर लगेच मुंबई आणि पुण्याकडच्या टोलनाक्यावरून पुढे वाहने जाऊ न देता पोलिसांनी पर्यायी मार्गाने जायला भाग पडले असते, तर लाखो लोकांना ३२ तास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागले नसते. या वाहतूक कोंडीदरम्यान अनेक ठिकाणी वाहतूक पोलिस दिसले, हे खरे. त्यांनी प्रयत्नही केले; पण अपुऱ्या मनुष्यबळात, तांत्रिक साधनांशिवाय आणि वरिष्ठ पातळीवरील निर्णयांशिवाय ते काय करणार? मूळ जबाबदारी आहे सार्वजनिक बांधकाम विभाग, महामार्ग प्राधिकरण, राज्य परिवहन विभाग, गृह विभाग, जिल्हा प्रशासनाची. या सर्व यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून आला. एकमेकांकडे बोट दाखवण्याची आणि जबाबदारी झटकून टाकण्याची आपली शासकीय संस्कृती अजूनही बदललेली नाही. या ३२ तासांच्या कोंडीमुळे व्यवहार ठप्प झाले. मालवाहतूक खोळंबली. दूध, भाजीपाल्याचे नुकसान झाले. औषधे उशिरा पोहोचली. पर्यटनावर परिणाम झाला. इंधनाचा अपव्यय झाला. याचा थेट परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवर झाला. कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. त्याची जबाबदारी कोण घेणार? कोणी चौकशी करणार आहे का? कोंडी सुरू झाल्यानंतरही अनेक तास नागरिकांना पर्यायी मार्गांची माहिती मिळाली नाही. 'सोशल मीडिया'वर अफवा, अर्धवट माहिती आणि गोंधळ याचेच साम्राज्य होते.

आज 'डिजिटल इंडिया'च्या युगातही सरकारकडे रिअल-टाइम ट्रॅफिक अपडेट सिस्टीम नसणे ही एक लाजिरवाणी बाब आहे. एक साधा एसएमएस अलर्ट, ॲप नोटिफिकेशन किंवा एफएम रेडिओवर सूचना करणे इतके अवघड होते का? या अपघातानंतर २४ तास तत्काळ प्रतिसाद यंत्रणा बोरघाट परिसरात कायमस्वरूपी तैनात करणे, अत्याधुनिक क्रेन आणि रेस्क्यू वाहने उपलब्ध ठेवणे, स्मार्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम, पर्यायी मार्गांची पूर्वनियोजित योजना, नागरिकांसाठी आपत्कालीन मदत केंद्र, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई, नियमित मॉक ड्रिल आणि आपत्ती सराव हे उपाय कागदावर न राहता जमिनीवर उतरले पाहिजेत. ही केवळ कोंडी नाही, तो इशारा आहे. बोरघाटातील ३२ तासांची वाहतूक कोंडी ही एक साधी घटना नाही. ती राज्याच्या प्रशासनाला मिळालेली जोरदार थप्पड आहे. याकडे गांभीर्याने पाहणार नसल्यास उद्या आणखी मोठी दुर्घटना आपली वाट पाहत आहे. विकास म्हणजे फक्त रस्ते बांधणे नाही, तर संकटात नागरिकांना सुरक्षित, सन्मानाने आणि वेळेत मदत देणे होय. मुंबई-पुणे महामार्ग हा केवळ दोन शहरांना जोडणारा रस्ता नाही, तर महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक आणि सामाजिक जीवनाचा कणा आहे. देशाची आर्थिक राजधानी मुंबई आणि आयटी, शिक्षण व उद्योगांचे केंद्र पुणे यांना जोडणारा हा मार्ग दिवस-रात्र लाखो वाहनांचा भार सहन करतो; मात्र वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, वाहनसंख्या आणि अपुरी पायाभूत सुविधा यामुळे हा महामार्ग आज गंभीर तणावाखाली आहे. सततची वाहतूक कोंडी, अपघात, वेळेचा अपव्यय आणि आर्थिक नुकसान यामुळे या महामार्गाला पर्यायी मार्गाची गरज जाणवते.

गेल्या दोन दशकांमध्ये मुंबई-पुणे मार्गावरील वाहनसंख्या अनेक पटींनी वाढली आहे. खासगी कार, टॅक्सी, लक्झरी बस, मालवाहू ट्रक, कंटेनर वाहने यांचा सततचा ओघ या मार्गावर असतो. एकाच मार्गावर एवढा भार टाकणे म्हणजे व्यवस्थेला जाणीवपूर्वक अपयशाकडे ढकलण्यासारखे आहे. कोणत्याही प्रगत राष्ट्रात एका महत्त्वाच्या आर्थिक कॉरिडॉरसाठी एकच प्रमुख मार्ग ठेवला जात नाही. पर्यायी मार्गांचे जाळे उभे केले जाते; मात्र महाराष्ट्रात ही संकल्पना अजूनही अपुरी आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग सुरू झाला, तेव्हा क्रांतिकारी मानला गेला. प्रवासाचा वेळ कमी झाला, सुविधा वाढल्या, सुरक्षिततेत सुधारणा झाली; पण आज तोच द्रुतगती मार्ग क्षमतेच्या पलीकडे वापरला जात आहे. द्रुतगती मार्ग म्हणजे पर्याय नव्हे, तर मुख्य महामार्गाला पूरक व्यवस्था होती. आज मात्र तोच मुख्य मार्ग बनला आहे. यामुळे अपघात, कोंडी आणि देखभालीच्या समस्या वाढत आहेत. ही स्थिती विकासाच्या धोरणातील मोठी त्रुटी आहे. पिंपरी-चिंचवड, तळेगाव, चाकण, उरण, पनवेल, नवी मुंबई या भागांमधील उद्योगांचा कच्चा माल आणि तयार उत्पादने याच मार्गावरून नेली जातात. वाहतूक खोळंबल्यास पुरवठा साखळी विस्कळीत होते. उद्योगांचे नुकसान होते. आयात-निर्यातीवर परिणाम होतो. गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होतो. म्हणजेच एक मार्ग ठप्प झाला, की संपूर्ण अर्थव्यवस्थेला हादरा बसतो. ही जोखीम कोणत्याही प्रगत राज्याला परवडणारी नाही. वाहतूक कोंडीत तासनतास उभ्या असलेल्या वाहनांमुळे प्रचंड प्रमाणात इंधन वाया जाते. कार्बन उत्सर्जन वाढते, हवेचे प्रदूषण होते, नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होतो.

महाराष्ट्रात रस्ते बांधले जातात; पण दीर्घकालीन वाहतूक नियोजनाचा अभाव दिसतो. समस्या निर्माण झाल्यावर उपाय शोधले जातात. हे प्रतिक्रियात्मक धोरण आहे, दूरदृष्टीचे नव्हे. फक्त रस्ते रुंद करणे हा उपाय नाही. नवे मार्ग, स्मार्ट वाहतूक व्यवस्थापन, बहुविध वाहतूक प्रणाली (रस्ता-रेल्वे-जलमार्ग) यांचा समन्वय साधणे ही काळाची गरज आहे. विकास म्हणजे गर्दी वाढवणे नव्हे, तर ती नियोजनबद्ध पद्धतीने वाटून देणे. खंडाळा अर्थात बोरघाट हा कायमच अपघात, कोंडी आणि अनिश्चिततेचा केंद्रबिंदू ठरला आहे. पावसाळा असो, अपघात असो, दरड कोसळणे असो किंवा अवजड वाहन बिघाड एक छोटीशी घटना घडली, तरी संपूर्ण महामार्ग ठप्प होतो. अशा परिस्थितीत शिरूर-चाकण-तळेगाव-कर्जत हा पर्यायी महामार्ग तातडीने विकसित करणे ही केवळ गरज नाही, तर राज्याच्या विकासासाठीची अपरिहार्यता बनली आहे. पुणे जिल्ह्याचा औद्योगिक पट्टा, अहमदनगरकडे जाणारा मार्ग, मुंबई महानगर क्षेत्र आणि कोकणपट्टा यांना जोडणारी ही नैसर्गिक साखळी आहे. हा मार्ग विकसित झाल्यास बोरघाटावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल. औद्योगिक वाहतूक वेगवान होईल. ग्रामीण भागाला विकासाची संधी मिळेल. नवी आर्थिक साखळी तयार होईल. चाकण, तळेगाव, रांजणगाव, शिक्रापूर ही महाराष्ट्राची प्रमुख औद्योगिक केंद्रे आहेत. देश-विदेशातील मोठ्या कंपन्या येथे कार्यरत आहेत. हजारो कोटींची गुंतवणूक, लाखो रोजगार या भागावर अवलंबून आहेत; पण वाहतुकीच्या समस्येमुळे मालवाहतूक वेळेवर होत नाही. उत्पादन खर्च वाढतो. निर्यातीवर परिणाम होतो. गुंतवणूकदार नाराज होतात.

एक सक्षम पर्यायी महामार्ग नसल्यामुळे हा औद्योगिक पट्टा आजही अपुऱ्या पायाभूत सुविधांमध्ये अडकला आहे. कर्जत हे मुंबई, नवी मुंबई आणि कोकणाकडे जाणारे प्रमुख प्रवेशद्वार आहे. कर्जत-पनवेल-उरण-जेएनपीटी हा भाग देशातील सर्वात महत्त्वाच्या लॉजिस्टिक कॉरिडॉरपैकी एक आहे. शिरूर-चाकण-तळेगाव-कर्जत मार्ग प्रत्यक्षात आला, तर पुणे, अहमदनगर, मराठवाडा, विदर्भातून येणारी वाहतूक बोरघाट न वापरता थेट मुंबई परिसरात सहज पोहोचू शकेल. हा नव्या विकासाचा महामार्ग ठरेल. त्याची उभारणी तातडीने हाती घेऊन पूर्ण करणे हा बोरघाटातील अपघातातून मिळालेला धडा आहे.

# सत्तेकारण जीव वेडावला; सदस्य गोव्यात गुदमरला

सुयोग आंग्रे

नुकतीच रायगड जिल्हा परिषदेची सार्वत्रिक निवडणूक पार पडली. जिल्हा परिषदेच्या ५९ गटांसाठी झालेल्या निवडणुकीत कोणत्याच पक्षाकडे एक हाती सत्ता आली नाही. जिल्ह्याचा विकास करण्यासाठीच्या आश्वासनांची खैरात मतदारसंघात करणाऱ्या सदस्यांनी आता सत्तेचा मलिदा चाखणायच्या दिशेने वाटचाल केली आहे. रायगड जिल्ह्याच्या राजकारणात नेहमीच उलटफेर अनुभवण्याची वेळ रायगडवासियांवर येते. याही निवडणुकीत यापेक्षा वेगळे काहीच झाले नाही. स्थानिक पातळीवर आपापल्या सोयीने राजकारण करीत राजकीय पक्षांनी आपली पोळी भाजून निवडून येण्यासाठी यशस्वी प्रयत्न केलेलं पाहावयास मिळाले. यामध्ये राज्याच्या सत्ताकारणात महायुतीमध्ये असणाऱ्या राजकीय पक्षांचाच बोलबाला होता. भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट यांची रायगड जिल्ह्यात युती झाली होती. परंतु शिवसेनेच्या शिंदेगटाने एकाला चलोचा नारा देत या दोन बलाढ्य पक्षांना आव्हान दिले होते. निवडणुकीचे रण जसजसे तापले तसतसे निवडणूक अधिक उत्सुकतेची झाली. यामध्ये महाविकास आघाडीमधील घटक पक्षांनी शिंदे गटाला शह देण्यासाठी कर्जत तालुक्यात परिवर्तनाच्या लढाईत आपले योगदान देत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने आपले पाऊल जिल्हापरिषदेतील सत्तेच्या दिशेने टाकले. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पाच सदस्य निवडून आले आहेत. यामध्ये २ कर्जत, २ उरण आणि एक पेण तालुक्यात उबठाचा सदस्य निवडून आला. शिंदे गटाला विरोध म्हणाल्यावर त्यांनी भाजप , राष्ट्रवादी युतीच्या खेम्यात आपली उपस्थिती दर्शवली. रायगड जिल्हा परिषदेच्या सत्ताकारणात सत्तेच्या चाव्या ताब्यात घेण्यासाठी ३१ जागांची मॅजिक फिगर पार करणे गरजेचे होते. परंतु यामध्ये कोणताच राजकीय पक्ष आपले बहुमत सिद्ध करू शकला नाही. शिवसेना शिंदे गट २१ जागा, भारतीय जनता पार्टी १६ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट १५ जागा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट ५ जागा आणि काँग्रेस पक्षाने दोन जागा जिंकल्या. उबाठा आणि काँग्रेस ज्या ठिकाणी निवडून आले आहेत. त्या ठिकाणी महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहत विरोधी पक्षातील उमेदवारांना चारीमुंड्या चित केले. निवडणूक झाली.सत्तेच्या बेरजेचे गणित सोडविण्यासाठी फोडाफोडीचे राजकरण करण्यासाठी घोडेबाजार उसळणार याची कुणकुण लागताच भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्यांनी आपल्या निवडून आलेल्या सदस्यांना थेट गोवा टूरला नेले. भाजप आणि राष्ट्रवादीच्या निवडून आलेल्या सदस्यांची बेरीज मॅजिक फिगर पर्यंत पोहोचणारी आहे. त्यामुळे सत्तेत भाजप राष्ट्रवादी बसणार हे जवळपास निश्चित झाले. परंतु राष्ट्रवादीच्या परिवर्तन पॅनलमध्ये सहभागी झालेल्या उबाठाच्या निवडून आलेल्या सदस्यांना सत्तेची ऑफर मिळाल्याने त्यांनी देखील गोवा पिकनिकला जाण्याचा निर्णय घेतला. निवडणूक निकाल लागल्यानंतर रायगड जिल्हा परिषदेच्या सत्तेचा गाडा हाकणाऱ्या सदस्यांनी रायगडातून थेट गोव्याकडे कूच केली. १० फेब्रुवारीपासून निवडून आलेले सदस्य आपल्या चमूसह गोव्यात पंचतारांकित हॉटेलमध्ये मज्जानु लाईफ अनुभवत आहेत. सदस्यांची हि गोवा टूर पंधरवडा पार करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. निवडणुकीच्या काळात कागदावरील खर्च सोडला तर कोट्यवधी रुपयांचा पाऊस रायगड जिल्ह्यात कोसळला. त्यानंतर आता सत्तेची खुर्ची काबीज करण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा चुराडा केला जात आहे. निवडून आल्यानंतर मतदारांबरोबर चर्चा , सत्कार, मिरवणूक काढण्याच्या आधीच काही सदस्यांना गोव्याच्या दिशेने आपली वाहने वळवावी लागली. यामुळे मतदारसंघातील मेजवान्यांना ब्रेक बसला. सुरुवातीला पंचतारांकित हॉटेलमध्ये मज्जा करण्यासाठी मिळणार या आशेने सर्व सदस्य आनंदात होते. सदस्य गोव्यात गेले तेव्हा जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवड होण्याच्या दिवशी थेट अलिबागमध्ये जाणार आणि हि तारीख लवकरच जाहीर होईल असे सदस्यांना सांगण्यात आले होते. परंतु शासनाने जिल्हा परिषद निवडीची तारीख जाहीर न केल्याने सत्ताधारी बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या राजकीय पक्षाच्या सरकारी खजिन्याला तडा जाण्यास सुरुवात झाली आहे. सत्ताधारी चमूमध्ये दाखल असणाऱ्या सदस्यांपैकी काही सदस्य आता कंटाळले आहेत. त्यांनी आपल्या आप्तांना बाहेर संपर्क करणाया सुरवात केली आहे. तब्बल १५ दिवस एकाच ठिकाणी अडकून पडल्याने निवडून आलेल्या सदस्यांना आपली कामे करणे अवघड होत आहे. गोव्यात एशोआराम असलातरी स्वतःच्या सरकारी खजिन्याला आपसूक तडा बसत असल्याने हे सदस्य नाराज असलायचे चित्र आहे. फक्त वरिष्ठांच्या भीतीने आपले दुखणे कोणीही बोलून दाखवत नाही. अशी परिस्थिती भाजप, राष्ट्रवादी , उबाठामधील सदस्यांची आहे. तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गट अजूनही सत्तेत बसण्यासाठी गोव्याच्या दिशेने आपले गुप्तहेर पेरून बसले आहेत. मुंबईच्या दिशेने थेट वरिष्ठांशी वाटाघाटीची बोलणी करण्यासाठी धडपडत आहेत. अद्यापतरी त्यांच्या हाताशी ठोस लागलेले नाही. असे असलेतरी आम्ही सत्तेत असणार असे विश्वासाने शिंदे गटाचे नेते बोलताना दिसत आहेत. यामुळे रायगड जिल्हा परिषदेच्या सत्तेच्या गणितामध्ये महायुतीमधील शिंदे गट असणार कि त्यांना विरोधी बाकावरच बसावे लागणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

लोकसंसद

## "आदि मी, अनंत मी"

नुकतीच स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी झाली. १९ तारखेला आपण शिवजयंती साजरी केली. स्वातंत्र्यवीर सावरकर, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, स्वामी विवेकानंद या व्यक्ती नव्हत्या तर विचार होता. राष्ट्र, धर्महित, संस्कृती, सभ्यता, परंपरा जपणारा विचार म्हणूनच तो नष्ट झाला नाही. काही वर्षापासून हा विचार दाबण्याचा, नष्ट करण्याचा तऱ्हेने प्रयत्न झाला. साम, दाम, दंड, भेद याचा उपयोग करून, तर कधी खोट्या कथानकाचा आधार घेत, कधी खोटे पुरावे दाखवून, कधी प्रेमासारख्या पवित्र भावनेला अपवित्र करून येन केन प्रकरणेन हे विचार नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. हे विचार, नुसते विचार नव्हते तर आत्मतेज्याने झळकणारे धकधकते निखारे होते. काही काळासाठी ह्या सात्विक, पवित्र विचारांवर रजतम कणांचे म्हणजेच पापी, धर्मांध लोकांच्या विचाराचे धुलीकरण जमा झाले आहे. राष्ट्र, धर्मप्रेमी यांनी हळुवार फुंकर घातली आणि त्यावरील धुळीकण दूर होऊ लागले. प्रत्येकाच्या मनात या पवित्र विचारांचे स्फुलिंग फुलले आणि परिस्थिती बदलत चालली आहे. हिंदू आता जागृत होऊ लागला आहे. लोकांच्या मनात या पवित्र विचारांचे स्फुलिंग फुलवण्याचे काम गोवा आणि नवी दिल्ली येथे झालेल्या सनातन राष्ट्र संखनाद या महोत्सवाने आणि धर्मप्रेमी, राष्ट्रप्रेमी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नमुळे झाले आहे. हे स्फुलिंग असेच धगधगते ठेवण्याच्या दृष्टीने मुंबई येथे मे महिन्यात शंखनाद रामराज्याचा होणार आहे. सर्वांमध्ये असलेली ईश्वरी चेतना जागृत होऊ लागली आहे. समाजाची धारणा, राष्ट्राचे स्थैर्य आणि स्वातंत्र्य हे केवळ राजसत्तेवर अवलंबून नाही तर संस्कारावर अवलंबून आहे.

**– लीना मकरंद गाडगीळ, पनवेल**

दिनविशेष

# छत्रपती राजाराम महाराज

विनायक कोंडदेव ओक यांचा जन्म २५ फेब्रुवारी १८४० रोजी झाला. हे मराठीतील आद्य लघुकादंबरीकार होत. शिरस्तेदार ही त्यांनी लिहिलेली मराठीतली पहिली लघुकादंबरी. ती इ.स. १८८१ मध्ये प्रकाशित झाली होती. मुलांना बहुर्शुत बनवण्यासाठी, त्यांना वाचनाचा खरा आनंद देण्यासाठी त्यांनी वाचणे आवश्यक आहे असे शालेय शिक्षणाला जोड म्हणून पूरक वाचन काय देता येईल याचा ज्यांनी विचार केला, त्यात विनायक कोंडदेव ओक यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. विशेष म्हणजे स्वत: ओकांचे शालेय शिक्षण इंग्रजी तिसरीपर्यंतच झाले होते. दरमहा आठ रुपये पगारावर प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून त्यांनी नोकरीला प्रारंभ केला आणि दरमहा १०० रुपये पगार असलेले शिक्षणाधिकारी म्हणून ते नवृत्त झाले. इ.स. १८६०च्या सुमारास ओकांनी आपल्या लेखनाला सुरुवात केली. तो काळ मराठीत विविध विषयांवर विपुल पुस्तके प्रसिद्ध होणारा काळ नव्हता. फारशी मराठी पुस्तकेच अस्तित्वात नसल्यामुळे दक्षिणा प्राइज कमिटी मराठी ग्रंथलेखनाला उत्तेजन देण्यासाठी पारितोषिके देत होती. शाळेतील मुलांना पुरवणी वाचन म्हणून वाचण्यासाठी मेजर थॉमस कँडीसारखी शिक्षण खात्याशी संबंधित माणसे स्वत:ही छोटी-छोटी पुस्तके लिहीत होती. अशा काळात ज्यांनी मुलांसाठी लिहिणे हेच आपले जीवित कर्तव्य मानले अशा मराठी लेखकांत विनायक कोंडदेव ओक हे नाव अग्रभागी घ्यावे लागते. दिसामाजी काही तरी ते लिहावे हा रामदासांचा उपदेश ओकांनी तंतोतंत पाळला होता. दररोज निदान दोन पाने तरी लेखन केलेच पाहिजे, असा त्यांनी स्वत:ला दंडक घालून घेतला होता. विनायक कोंडदेव ओकांनी १८८१मध्ये बालबोध नावाचे लहान मुलांसाठी असलेले मासिक सुरू केले. या मासिकाचे ते ३४ वर्षे संपादक होते. मासिकाचा सर्व मजकूर ते स्वत:च लिहून काढीत. हे मासिक दीर्घकाळ चालले, याचे एक कारण ओकांची सुबोध शैली हे होते. स्वत: ओकांना मोरोपंतांची कविता आवडे; परंतु त्यांचे लेखन मात्र अतिशय सोप्या मराठीत असे. या मासिकातील लेखनाव्यतिरिक्त ओकांच्या नावावर अनेक पुस्तके आहेत. त्यांची संख्या पन्नासच्या जवळपास भरेल. एकट्या बालबोध मासिकातच चारशेहून अधिक कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. छोटे-छोटे निबंध लिहून ओकांनी नव्या पिढीला शालेय पुस्तकात नसलेली माहिती दिली. आपल्या मासिकाचा उद्देश सांगताना त्यांनी लिहिले आहे, शाळेत कळत नाहीत; पण तुम्हाला कळल्या पाहिजेत अशा लक्षावधी गोष्टी दर खेपेला थोड्या थोड्या अशा तुम्हाला अगदी सोप्या व मनोरंजक भाषेत सांगून तुमच्या अंगचे सद्गुण वाढावेत आणि दिवसेंदिवस तुम्ही शहाणे आणि सुखी व्हावेत यासाठी आमचा प्रयत्न आहे. विनायकरावांचा हा उद्देश आणि त्यांचा दीघरेद्योग लक्षात घेतला म्हणजे साने गुरुजींचे ते पूर्वज ठरतात. विनायक कोंडदेव ओक अहमदनगर जिल्ह्यातल्या नेवासे या गावी राहत.

या मधुमक्षिकेमध्ये विविध प्रकारचे विषय एकत्र केले असले तरी ते इंग्रजीच्या आधाराने का होईना, ओकांनी स्वत:च लिहिले आहेत. त्यामुळे या पुस्तकास वेच्यांचे पुस्तक म्हणता येणार नाही. या पुस्तकातील एका वैशिष्ट्यपूर्ण विषयाकडे लक्ष वेधले पाहिजे. मोहनलालाचे प्रवासवर्णन सांगणारे चार भाग या पुस्तकात आहेत. अब्राहम लिंकन (चरित्र), अमीर अब्दुल रहिमान (चरित्र), इतिहासतरंगिणी, गद्य , जावजी दादाजी चौधरी (चरित्र), ड्यूक ऑफ वेलिंग्टन (चरित्र), पितर धि ग्रेत (चरित्र) फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा इतिहास, मधुमक्षिका अथवा अनेक उपयुक्त व मनोरंजक विषयांचा संग्रह, रोम, वॉरन हेस्टिंग्जची गोष्ट शिरस्तेदार (लघुकादंबरी). अशा या प्रतिभावान कादंबरीकाराचे ९ ऑक्टोबर १९१४ रोजी निधन झाले.

# गुरांच्या दवाखान्याला टाळे

## ।। अनेक महिने पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा अभाव; पशुपालक संतप्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथे असलेले पशुवैद्यकीय दवाखाना गेली अनेक महिने बंद आहे. या दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने या दवाखान्याला टाळे लावण्यात आले आहे. दरम्यान या रुग्णालयातील डॉक्टर उपलब्ध नसल्याने नेरळ परिसरातील २० गावे आणि वाड्यामधील पशुपालकांना आपल्या पशूंना खासगी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडे उपचारासाठी न्यावे लागत आहे. त्यामुळे पशुपालक संतप्त झाले आहेत.



नेरळ गावातील खांडा भागात पशुवैद्यकीय दवाखाना असून किमान २० वर्षे तेथे पशुपालक यांना सेवा देण्याचे काम केले जात होते. मात्र गेल्या काही वर्षात नेरळ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी नाही. कर्जत तालुक्यात पशुवैद्यकीय अधिकारी यांची अनेक पदे रिक्त असल्याने नेरळमध्येदेखील गेली चार वर्षे कायमस्वरूपी पशुवैद्यकीय अधिकारी नाही. त्यामुळे आजुबाजूच्या पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुधन अधिकाऱ्यांकडे एकाहून अधिक पशुवैद्यकीय दवाखान्यांवर जबाबदारी दिली आहे. नेरळ येथे वाकस येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त जबाबदारी आहे. पुढे चिंचवली येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे माथेरान पशुवैद्यकीय दवाखान्याचा कारभार आहे. मात्र नेरळ परिसराचे पशुपालक यांच्यासाठी आरोग्य केंद्र असलेल्या नेरळ पशुवैद्यकीय दवाखान्याला कोणीही वाली नाही. त्यामुळे तेथे चक्क टाळे लावण्यात आले आहे.

नेरळ येथील पशुवैद्यकीय दवाखाना परिसरात असलेले पशुपालक यांच्या पशूंवर उपचार करण्याची वेळ आली तर खासगी पशुधन अधिकाऱ्यांकडे जावे लागत आहे. नेरळमधील दवाखान्याला टाळे लावण्यात आले असून येथे तेथील पर्यवेक्षक यांचा नंबर लावण्यात आला आहे. मात्र हे पर्यवेक्षक कर्मचारी शेतकऱ्यांचे फोन देखील घेत नाही आणि कोणत्याही प्रकारची माहिती देत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पशूवर कोणते उपचार करायचे? हे स्थानिक शेतकऱ्यांना कळत नाही. त्यामुळे नेरळ भागातील पशुपालक संकटात आले आहे.

### चौकशीची मागणी

लम्पीसारखा आजार शेतकऱ्यांच्या पशूंना भेडसावत आहे. त्यामुळे सरकारने या ठिकाणच्या कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच, पशुवैद्यकीय अधिकारी यांची महिनोन्महिने अनुपस्थिती आणि पशुधन दवाखान्याला लावलेले टाळे याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी भडवळ गावातील कार्यकर्ते महेश जामघरे यांनी केली आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ फेब्रुवारी

१) श्री.मधुकर रामभाऊ म्हात्रे
बेलोशी, अलिबाग
२५-०२-१९४६

२) श्रीम.लीना ललित भिसे
अलिबाग
२५-०२-१०५१

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

---

## नूतन विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय येथे शीख धर्माचे नववे गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहादत दिनानिमित्त विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सहिष्णुता व बलिदानाची भावना जागृत व्हावी, हा या कार्यक्रमामागील उद्देश होता. शासनाच्या शिक्षण विभागाकडून हा कार्यक्रम साजरा करून शालेय विद्यार्थ्यांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले. त्या अनुषंगाने ३५० व्या शहादत दिन प्रत्येक शाळेत विविध उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेत चित्रकला स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा तसेच वाचन स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत गुरु तेग बहादुर यांच्या जीवनकार्यावर आधारित सुंदर चित्रे साकारली व प्रश्नमंजुषेद्वारे आपले ज्ञान प्रदर्शित केले. तसेच गुरु तेग बहादुर कोण होते व त्यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवतेसाठी केलेले महान बलिदान याविषयी माहितीपट दाखविण्यात आला.



---

## न्यूनगंड न ठेवता आनंदी रहा: डॉ. नंदु गुळमुळे




**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

चांगले सुंदर आयुष्य जगण्यासाठी मनात कोणताही न्यूनगंड ठेवू नका, आनंदी रहा, असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.नंदू मुलमुळे यांनी केले. रायगड जिल्ह्यातील अलिबागमधील लोकप्रिय १००० कोटींची ठेव असलेली आदर्श पतसंस्थेच्या सभासद व नागरिकांसाठी पी.एन.पी. नाना लिमये नाट्यगृहात 'जगूया जाणिवपूर्वक' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, आपल्या भुतलावर प्राणी जीवनात फक्त आपल्या ७ पिढ्यांचा विचार करणारा फक्त माणूस आहे. तो जाणीवपूर्वक जगतो म्हणजे त्याच्या जीवनात ४ टप्पे असतात. यामधे यश, सुख, आनंद व समाधान हे आहेत. यात सुख घेऊन येतो. त्यामुळेच आनंद मिळून जातो आणि आपण समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करता तेव्हाच आनंद मिळतो. आपल्या घरातील मुले ही सभोवार पाहुन शिक्षण घेत असतात, हे ४०० वर्षापुर्वी गौतम बुद्धानीं सांगितले आहे. स्विकार करा जे आहे तसे आणि मनात न्यूनगंड ठेवु नका. प्रथम प्रत्येकाचे ऐका, मगच जे बोलायचंय आहे ते बोला. त्यामुळे माणसे, नातेवाईक नाराज होणार नाहीत. ज्येष्ठांनी मुलांच्या संसारात ढवळाढवळ करु नका, जीवन सुसह्य ठेवा आणि आनंदी रहा व पुढील आयुष्य जाणीवपूर्वक जगा, असा मंत्र त्यांनी यावेळी दिला.

यावेळी शहरातील जेष्ठ नागरिक, वकील, डॉक्टर, पत्रकार उपस्थित होते.

---

## देवकान्हे येथे विविध गुणदर्शन कार्यक्रम

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील डिजिटल प्राथमिक शाळा देवकान्हे येथे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रम पाहण्यासाठी खांब पंचक्रोशीतील रसिकप्रेमी नागरिक, ग्रामस्थ व विद्यार्थी वर्गाचे पालक तसेच माजी विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. कार्यक्रमात विद्यार्थी वर्गाने हिंदी, मराठी गीते, रिमिक्स गीते, फनी साँग, नाट्यछटा सादर करून उपस्थितांची मने जिंकून सर्वांचीच वाहवा मिळविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मनोज भोईर यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.



---

## 'कृषी क्षेत्रात 'शोधक्षमता' प्रणाली आवश्यक'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

जागतिक स्तरावर भारतीय कृषी उत्पादनांची विश्वासार्हता वाढवण्यासाठी ट्रेसिबिलिटी (शोधक्षमता) ही प्रणाली डिजिटल पायाभूत सुविधा म्हणून राबवणे आवश्यक आहे. असे मत पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव एन. रामास्वामी यांनी व्यक्त केले.

'महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९' धोरणातंर्गत 'जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन', एआय फॉर ॲग्री २०२६ या परिषदेत कृषी-एआयसाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा या विषयावरील परिसंवादमध्ये सचिव एन. रामास्वामी बोलत होते. यावेळी ट्रस्ट झिरो वनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रबीर मिश्रा, 'आयआयएमडीए'चे ट्रेड ट्रस्ट, सिंगापूरचे उपसंचालक चेंग केन वेई, बेटर कॉटन, इंडियाच्या भारतातील संचालक श्रीमती ज्योती नारायण कपूर, जर्मनी दूतावासच्या कृषी व अन्न विभाग प्रमुख व्होल्कर क्लिमा, रबर बोर्डचे कार्यकारी संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी एम. वसंतगेसेन यांनी सहभाग घेतला.

भारतीय शेती उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर एकमेकांशी जोडल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्मची निर्मिती करणे. कृषी क्षेत्रात उत्पादनक्षमता वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न वृद्धी आणि कृषीस्थैर्य साध्य करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हा परिवर्तनाचा प्रभावी साधन ठरू शकते, असा ठाम विश्वास तज्ज्ञांनी व्यक्त केला. एआयचा स्वीकार केवळ तांत्रिक नवकल्पनांवर नव्हे, तर मोजता येणाऱ्या परिणामांवर आणि शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उत्पन्नवाढीवर अवलंबून असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

शेतीची उत्पादनक्षमता आणि उत्पन्न वाढीसाठी एआयचा लक्षवेधी उपयोग करू शकतो. सर्वसाधारण तंत्रज्ञानाऐवजी पिकनिहाय आणि स्थानिक गरजांनुसार उपाययोजना विकसित करण्यावर भर दिला पाहिजे. यामध्ये शासन, खासगी क्षेत्र, संशोधन संस्था आणि वित्तीय संस्था यांच्यातील समन्वय वाढविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.

---

## भारतीय विद्या भवन अंतर्गत विविध उपक्रम




**। माथेरान । प्रतिनिधी ।**

नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत समुदाय सहभाग कार्यक्रमच्या अनुषंगाने चौपाटी मुंबई येथील भारतीय विद्या भवनच्या हजारीमल सोमणी विद्यालयाच्या राज्यशास्त्र अर्थशास्त्र व इतिहास विभाग आणि गांधी इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर एज्युकेशन अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने माथेरान येथे दोन दिवसीय शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम दि.१७ व १८ फेब्रुवारी रोजी नैमिशारण्य भारती विद्या भवन विश्रामगृह माथेरान येथे यशस्वीपणे पार पडला.

या कार्यक्रमात एकूण १८ विद्यार्थी, डॉ. विद्या मित्तल (राज्यशास्त्र विभाग प्रमुख आणि उपप्राचार्य) डॉ. किरण जाधव अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. रवी गावित राज्यशास्त्र विभाग, आणि फेवोरेटिस सतरवाला (इतिहास विभाग)असे एकूण ४ प्राध्यापक व पाच संसाधन व्यक्ती सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांसाठी स्थानिक समाजाशी प्रत्यक्ष संवाद साधता यावा सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी तसेच राजकीय प्रशासन व अर्थव्यवस्था इतिहासाचा अनुभवाधारीत अभ्यास व्हावा, या उद्देशाने विविध कार्यक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी बाजारपेठेचा सर्वेक्षण अभ्यास केला. शाळेला भेट देऊन तिथल्या शिक्षकांकडून शैक्षणिक स्थिती आणि आव्हाने समजून घेतले. स्थानिक, प्रशासकीय व राजकीय व्यवस्थेची कार्यपद्धती समजून घेण्यासाठी अधिकाऱ्यांशी संवाद साधण्यात आला.

दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी ध्यान व श्वसन व्यायाम घेण्यात आला. त्यानंतर मलंग पॉईंट येथे ट्रेकिंग करण्यात आले. यावेळी या स्थळाचा इतिहास दत्ता सनगरे यांनी सविस्तरपणे सांगितला. याचबरोबर वैशाली वाघमारे यांनी समुदाय सहभाग कार्यक्रमात उत्तम आरोग्याचे व जीवन कौशल्याचे महत्व यावर उत्तम मार्गदर्शन केले.

---

## लाडीवलीत गावदेवी मंदिराचा जीर्णोद्धार

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी परिसरातील लाडीवली गावाचे आराध्य दैवत आणि भक्तांच्या हाकेला धावणारी आई गावदेवी (लाडूबाई) हिचा वार्षिक उत्सव संपूर्ण गावात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. सुमारे १८०० सालापासून या जागृत देवस्थानाचा शोध लागल्याची परंपरा असून, आजही तितक्याच श्रद्धेने आणि एकजुटीने हा उत्सव साजरा केला जातो. गावावर येणारे संकट असो किंवा भक्तांची वैयक्तिक हाक, आई नेहमीच मदतीला धावून येते, अशी ग्रामस्थांची गाढ श्रद्धा आहे.



या उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे गावकऱ्यांनी एकत्र येऊन केलेला जिर्णोध्दार व प्राणप्रतिष्ठा सोहळा पाहण्यासाठी आणि देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. उत्सवाच्या दरम्यान संपूर्ण गाव रोषणाईने सजल्याने जणूकाही दिपावली आल्याचा भास झाला. सर्व जाती-धर्माचे लोक आणि विविध प्रांतातील नागरिक या उत्सवात सहभागी झाले होते. आईचा पालखी सोहळ्यात गावकऱ्यांची मोठी गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले. यावेळी आई गावदेवीच्या नावाने चांगभलंच्या जयघोषाने लाडीवली परिसर दुमदुमून गेला होता. सकाळी काकड आरतीनंतर आई लाडूबाई गावदेवी आईच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. दरम्यान गावाच्या परंपरेने गावातील ७५ ते ७० वर्षापासून माहेरवाशीणी यांना बोलवून त्यांचा मानसन्मान करण्यात आला.

---

## उरणमध्ये विठ्ठल रखुमाईचा गजर

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण शहरातील आनंद नगर येथील श्री क्षेत्र विठ्ठल रखुमाई मंदिराचा २५वा वर्धापन दिन विठ्ठल भक्त ह.भ.प. लक्ष्मन गजानन पाटील, विठ्ठल भक्त ह. भ.प. भरत गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.२२) मोठ्या उत्साहात पार पडला. या दिवशी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पाहुण्यांचे स्वागत, काकड आरती, अभिषेक, ज्ञानेश्वरी पारायण वाचन, पुष्पांजली कीर्तन,महाप्रसाद, भजन, पालखी मिरवणूक काढण्यात आली.

---

**मानव-वन्यजीव सहजीवनाचा संदेश** | **पुनर्वसु फाऊंडेशन, वन्यवाणी ग्रुपचा उपक्रम**

## 'भारूड-ए-बिबट'च्या माध्यमातून जनजागृती

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सी.बी.डी. बेलापूर परिसरातील बिबट्याबाबतचे गैरसमज आणि भीती दूर करण्यासाठी पुनर्वसु फाऊंडेशन आणि वन्यवाणी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच एक विशेष प्रबोधनात्मक उपक्रम राबवण्यात आला. ॲग्रो गार्डनच्या जुई यांच्या पुढाकाराने आयोजित वसंतउत्सव कार्यक्रमात 'भारूड-ए-बिबट' या विषयावर प्रभावी कलाविष्कार सादर करून नागरिकांना मानव-वन्यजीव सहजीवनाचा संदेश देण्यात आला.

मकरंद भास्कर सावंत यांचे लेखन व दिग्दर्शन आणि कुणिका बनसोडे सावंत यांची निर्मिती असलेल्या या भारुडाचे सादरीकरण महेश कापरेकर आणि सागर चव्हाण यांच्या टीमने केले. या उपक्रमात पुनर्वसु फाऊंडेशनतर्फे प्रितम दिलीप भुसाणे, उत्कर्षा चव्हाण, उमेश अवधूता, अष्टविनायक मोरे, सृष्टी सोनवणे, शुभम दळवी आणि स्मिता दळवी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. बिबट्या हा सजीव साखळीचा अविभाज्य भाग असल्याने बिबट्याला मानवाचा शत्रू मानणे चुकीचे आहे. बिबट्या किंवा अन्य प्राण्यांच्या अधिवासावर विकासाच्या नावावर अतिक्रमण केले जात असल्याने ते मानवी वस्तीकडे वळत आहेत. बिबट्या हा आपल्या नजरेच्या उंचीपेक्षा कमी उंची असणाऱ्या भक्ष्यावर हल्ला करतो. त्यामुळे बिबट्या समोर दिसल्यास माणसाने ताठ उभे रहावे किंवा उंच भागावर जावे, वनपरिसरात फिरताना मोबाईलवर गाणे वाजवावे, अशी माहिती देण्यात आली.



### पाणी साठ्यांचे पुनर्जीवन करण्याची मागणी

मानवाने नैसर्गिक पाणी साठे नष्ट केल्यामुळे उन्हाळ्यात वन्यजीव पाण्यासाठी मानवी वस्तीकडे वळत आहेत. ही बाब गांभीर्याने घेत पुनर्वसु फाऊंडेशनच्या उत्कर्षा चव्हाण आणि प्रीतम भुसाणे यांनी प्रशासनाकडे महत्त्वाची मागणी केली आहे. यामध्ये सिडको, नवी मुंबई महानगरपालिका आणि ठाणे वनविभागाने सेक्टर ८ बेलापूर टेकडीच्या पायथ्याला असलेल्या जुन्या तलावाचे तात्काळ पुनर्जीवन करावे. तसेच, सेक्टर ९ परिसरातील डोंगराच्या पायथ्याशी पावसाळ्यात वाहणारे पाणी अडवण्याची व्यवस्था करून वन्यजीवांसाठी पाण्याची सोय करावी, अशी मागणी करण्यात अली.

---

# निवडक



## संत गाडगे बाबा यांची जयंती साजरी

**पाली** : पाली नगरपंचयतीत राष्ट्रसंत संत गाडगे महाराज यांची १५०वी जयंती सोमवारी (दि.२३) साजरी करण्यात आली. पाली नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी माधुरी मडके, नगराध्यक्ष पराग मेहता, नगरसेवक सुधीर भालेराव यांनी संत गाडगे बाबा यांच्या स्मृतीस पुष्पहार अर्पण केले. तसेच नगरपंचायतमधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी देखील संत गाडगे बाबा यांच्या स्मृतीस अभिवादन केले. २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेंडगाव येथे जन्मलेले डेबूजी झिंगराजी जानोरकर म्हणजेच थोर समाजसुधारक, कीर्तनकार आणि स्वच्छतादूत संत गाडगे महाराज. स्वच्छता आणि माणुसकी हाच खरा धर्म मानणाऱ्या बाबांनी कीर्तनातून अंधश्रद्धा व जातिभेदावर प्रहार केले. महाराष्ट्रात स्वच्छतेचा संदेश, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षण प्रसार आणि दीन-दलितांची सेवा करण्याचे त्यांनी कार्य केले. गोड बोलू नका, खरे बोला आणि माणसातच देव शोधा या विचारांचे गाडगे बाबा होते. हातात झाडू घेऊन त्यांनी गावोगावी स्वच्छता केली म्हणून त्यांना स्वच्छतेचे प्रतीक बोलले जाते. कीर्तनाच्या माध्यमातून ते लोकांना शिक्षित व्हा, स्वच्छ रहा असे प्रबोधनत्मक आवाहन करत असत. गाडगेबाबांची जयंती स्वच्छता दिन म्हणून साजरी केली जाते.




## दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा

**उरण** : विद्यार्थ्यांची परिक्षेची भिती दूर करुन हसतमुख चेहऱ्याने मुक्तपणे परिक्षेला सामोरे जाण्याच्या हेतूने यु.ई.एस. संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, खजिनदार ॲड. अपूर्वा ठाकूर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व शिक्षकांच्या हस्ते प्रत्येक विदयार्थ्याला गुलाबाचे फूल देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. यावर्षी यु.ई.एस. स्कूल ॲण्ड कॉलेजमध्ये दि.२० फेब्रुवारी रोजी झालेल्या परिक्षेसाठी एकूण ०६ ब्लॉकमध्ये मराठी मिडीयम शाळेतील १०० तर उर्दू मिडीयम शाळेतील ३० असे एकूण १३० विदयार्थी परिक्षा देण्यासाठी आले होते. तर दि.२३ फेब्रुवारी रोजी एकूण १५ ब्लॉकमध्ये उरणमधील यु. ई. एस. इंग्लिश मिडीयम स्कूल उरण, जी. ई. आय इंग्लिश मिडीयम स्कूल उरण, रोटरी इंग्लिश मिडीयम स्कूल उरण, सेंटमेरी हायस्कूल उरण, द्रोणागिरी इंग्लिश व मराठी मिडीयम हायस्कूल करंजा, सिटीझन हायस्कूल उरण, सेंटमेरी स्कूल जेएनपी, न्यु. इंग्लिश स्कूल मोरा, इक्रा इंग्लिश मिडीयम स्कूल उरण, असे इंग्लिश मिडीयम शाळेतील ३२३ तर उर्दू मिडीयम शाळेतील ३० असे एकूण ३५३ विद्यार्थी परिक्षा देत आहेत.

## स्नेहाची फॅशन शोमध्ये दमदार कामगिरी



**रसायनी :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या अंतर्गत कार्यरत चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज येथील टी. वाय.बी.एस्सी. (फॅशन डिझाइन) शाखेची विद्यार्थिनी स्नेहा सुनिल कोरडे हिने आपल्या उल्लेखनीय कामगिरीने महाविद्यालयासह कोन गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या 'निर्मिती २०२५-२६ फॅशन' शोमध्ये स्नेहा हिने विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट यश संपादन करत एकूण पाच सर्टिफिकेट्स व पाच ट्रॉफीज पटकावल्या. यामध्ये सर्वोत्कृष्ट पृष्ठभाग अलंकरण, सर्वोत्तम आदिवासी प्रेरित संग्रह, वर्षातील विद्यार्थिनी तसेच इतर विशेष कामगिरीबद्दल गौरव करण्यात आला. तिच्या एकूण उत्कृष्ट सादरीकरणामुळे परीक्षक व उपस्थितांकडून तिचे विशेष कौतुक करण्यात आले. या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक व रायगड जिल्ह्याचे माजी खासदार रामशेठ ठाकुर यांच्या शुभहस्ते तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एस.के. पाटील यांच्या हस्ते स्नेहाला ट्रॉफी व सर्टिफिकेट प्रदान करून सन्मानित करण्यात आले. स्नेहा ही कोन गावची रहिवासी असून तिच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वांद्रे येथे 'फिट सॅटर्डे' मोहीम



**मुंबई :** रोजच्या धकाधकीच्या वेळापत्रकातून मुंबईकर नागरिकांनी सुदृढ आणि निरोगी आरोग्यासाठी वेळ काढणे आवश्यक आहे. मुंबईकरांच्या आरोग्यवर्धनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका फिट सॅटडसारखे विविध उपक्रम सातत्याने राबवत असते. नागरिकांनी त्यात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अविनाश ढाकणे यांनी केले. वांद्रे येथील एम.आय.जी. क्लब येथे शनिवारी (दि.२१) आयोजित फिट सॅटर्डे उपक्रमात डॉ. ढाकणे बोलत होते. मुंबईकर नागरिकांचे आरोग्य सुदृढ आणि दैनंदिन जीवनशैली तंदुरुस्त रहावी, या उद्देशाने फिट इंडियाच्या धर्तीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे फिट मुंबई पुढाकार अंतर्गत फिट सॅटर्डे ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा शुभारंभ गतवर्षी २५ ऑक्टोबर २०२५ रोजी वांद्रे किल्ला उद्यान येथे करण्यात आला होता. यापुढे प्रत्येक शनिवारी सकाळी ६.३० वाजता वांद्रे येथील किल्ला उद्यान परिसर आणि एम.आय.जी. क्लब या ठिकाणी ही मोहीम पार पडणार आहे. तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि फिट इंडिया मूव्हमेंट यांच्या सहकार्याने महानगरपालिकेच्या सर्व २६ प्रशासकीय विभागांमध्ये ही मोहीम राबविण्याचे प्रस्तावित आहे.

# श्रीवर्धनच्या नागरिकांचा ‘आधार’ हरवला

## ।। ११ महिन्यांपासून केंद्रे बंद ।। नागरिकांचे शासकीय कामकाज रखडले

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी।**

श्रीवर्धन शहर व तालुक्यातील नागरिकांना गेल्या तब्बल ११ महिन्यांपासून आधारकार्ड सेवेसाठी अक्षरशः वणवण भटकावे लागत आहे शहरातील तीनही आधार नोंदणी व अद्ययावत (अपडेट) केंद्रे बंद असल्याने नवीन नोंदणी, पत्ता बदल, मोबाईल क्रमांक लिंक, बायोमेट्रिक अपडेट, दुरुस्ती आदी सर्व कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत. परिणामी, हजारो नागरिकांचे शासकीय कामकाज रखडले असून संपूर्ण तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.




आधारकार्ड अपडेट किंवा नोंदणीसाठी नागरिकांना बोर्ली पंचतन, म्हसळा, महाड, माणगाव, आदी नजीकच्या तालुक्यांमध्ये जावे लागत आहे. एका अपडेटसाठी किमान एक दिवस खर्ची पडत असून प्रवास, भोजन व इतर खर्च मिळून ५०० ते १००० रुपयांपर्यंत आर्थिक भार सहन करावा लागत आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना दिवसाचा मजुरी तोटा सहन करावा लागत असल्याने आर्थिक अडचणी अधिक तीव्र झाल्या आहेत.

आधारकार्ड हे शिष्यवृत्ती, संजय गांधी निराधार योजना, वृद्धापकाळ पेन्शन, गॅस अनुदान, पीएम किसान योजना, बँक व्यवहार, यांसारख्या विविध शासकीय सेवांसाठी अनिवार्य आहे.

मात्र शहरात सेवा उपलब्ध नसल्याने अनेक लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांना विलंब होत आहे, ज्येष्ठ नागरिकांच्या पेन्शन प्रस्तावांमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत, तर बँक खात्यांशी आधार लिंक नसल्याने व्यवहार अडकले आहेत. विशेषतः दिव्यांग व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांना बाहेरगावी प्रवास करणे अत्यंत जिकिरीचे ठरत आहे. बायोमेट्रिक अपडेटसाठी वारंवार फेऱ्या माराव्या लागत असल्याने त्यांची शारीरिक व मानसिक दोन्ही प्रकारची झीज होत आहे. आधार अपडेट नसल्याने दिव्यांग प्रमाणपत्राची प्रक्रिया थांबली आहे, अशी व्यथा काही लाभार्थ्यांनी व्यक्त केली. महिलांनाही लहान मुलांसह बाहेरगावी जावे लागत असल्याने मोठी गैरसोय होत आहे.

लवकरात लवकर किमान एक कायमस्वरूपी आधार सेवा केंद्र सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप करून प्रशासनावर दबाव आणावा, अशी मागणी जोर धरत आहे. श्रीवर्धनचा ‘आधार’ हरवला असून, तो पुन्हा नागरिकांना कधी मिळणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

नागरिकांनी तहसील कार्यालय, पंचायत समिती तसेच संबंधित विभागांकडे अनेक वेळा लेखी निवेदने दिली आहेत. मात्र, अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याचा आरोप होत आहे. श्रीवर्धनसारख्या पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या शहरात आधार केंद्र नसणे ही गंभीर व लाजिरवाणी बाब आहे, अशी प्रतिक्रिया स्थानिक सामाजिक संघटनांनी व्यक्त केली आहे.

## जिल्ह्यात फिरते लोक अदालत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मा.उच्च न्यायालय विधी सेवा समिती मुंबई यांच्या निर्देशानुसार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग राजेंद्र द. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली न्याय आपले दारी या संज्ञे अंतर्गत दि.०२ ते दि.३० मार्च कालावधीत संपूर्ण रायगड जिल्ह्यात फिरते लोक अदालत व कायदेशीर शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. फिरत्या लोकअदालतीचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग राजेंद्र द. सावंत यांनी केले आहे. फिरते लोकअदालतीचे उद्घाटन दि.२ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता रायगड जिल्हा न्यायालयाचे प्रांगणात होणार आहे.

## निवडक

### चौल केंद्राचा बाल मेळावा उत्साहात

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील चौल केंद्राचा आनंददायी बाल मेळावा बुधवारी (दि.१८) फेब्रुवारी रोजी काळभैरव मंदिर रेवदंडा येथे मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कला, क्रीडा या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. सदर मेळाव्यामध्ये जिल्हा परिषदेच्या ११ शाळांनी सहभाग नोंदवला होता. बालमेळाव्यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण, फनी गेम्सचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना पालक व उपस्थित मान्यवरांकडून भरभरून दाद मिळाली. कार्यक्रमासाठी भूषण घरत, आर. डी. नाईक, संदीप पाटील, रोहिदास महाले, ज्ञानेश्वर घरत उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चौल केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र पाटील, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, जेवण बनवणाऱ्या मावशी व पालक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शेवटी सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप पाटील यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.




### चांदेवाडीत गरजूंना ब्लँकेट वाटप

**माणगाव :** विष्णुदास बुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र यांच्या पुढाकाराने आशाएँ चॅरिटेबल ट्रस्ट, नाकोडा दरबार (मंडळ) लालबाग, वर्धमान संस्कृती सेवाधाम, कोलाबा रोटी बँक, कोलाबा चौविहार हाऊस तसेच श्री पार्श्व वेनेजियन मानव सेवा समूह यांच्या संयुक्त विद्यमाने चांदेवाडी येथे गरजू कुटुंबांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. उपक्रमांतर्गत एकूण १३० लाभार्थी कुटुंबांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. थंडीच्या पार्श्वभूमीवर गरजू कुटुंबांना उब मिळावी आणि त्यांना आधार मिळावा हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. विष्णुदास बुवा ब्रह्मचारी सामाजिक केंद्र यांच्या पुढाकारामुळे हा उपक्रम यशस्वी झाला. संस्थेचे गोखले दाम्पत्य, तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सामाजिक कार्याबद्दल लाभार्थ्यांनी आयोजक संस्थांचे आभार व्यक्त करण्यात आले. हा उपक्रम सामाजिक बांधिलकी जपणारा असून, चांदेवाडी परिसरातील गरजू कुटुंबांसाठी दिलासादायक ठरला आहे.

### एल.एस.पी.एम महाविद्यालयात शिवमिरवणूक

**अलिबाग :** एल.एस.पी.एम महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती तसेच भव्य शिवमिरवणूक मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मान्यवरांनी शिवचरित्रावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना स्वराज्य, शौर्य, नेतृत्व व राष्ट्रप्रेम यांचे महत्त्व सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या सहभागातून शिवमिरवणूक काढण्यात आली.



घोषवाक्ये, ढोल-ताशांचा गजर आणि पारंपरिक वेशभूषेमुळे महाविद्यालय ते चोंढी संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने दुमदुमून गेला. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन गोंधळी, प्रा. रवींद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्टरीत्या पार पाडले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रवींद्र ठाकूर, राजेंद्र शिंदे, सहकार्यवाह जगन्नाथ पेढवी, किरण ठाकूर, महाविद्यालयाच्या प्राचार्या लीना पाटील, सुरेखा पाटील, संदीप पाटील, सर्व शिक्षक-प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालय व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तळ्यात अंधश्रद्धा निर्मूलन समितीची कार्यकारणी जाहीर

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची शाखा स्थापन करण्यात आली. यासाठी संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. यानंतर प्रा संदीप गायकवाड यांनी शाखेची पंचसूत्री, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा इतिहासची, माहिती उपस्थितांना दिली. त्यानंतर तळा शाखा कार्यकारणी निवड प्रक्रिया पार पडली. त्यामध्ये



अध्यक्षपदी राजू थिटेकर, उपाध्यक्ष भिमराज जाधव, कार्याध्यक्ष सुनील बैकर, प्रधान सचिव प्रकाश गायकवाड, विविध उपक्रम विभाग कार्यवाह संजय म्हस्के, वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग कार्यवाह मुजफ्फर शेख, युवा विभाग कार्यवाह सचिन भाटे, जोडीदाराची विवेकी निवड विभाग कार्यवाह स्वप्निल वरंडे, प्रा. भवरे, प्रशिक्षण विभाग कार्यवाह नितीन पाटील, मनोज वाढवळ, मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभाग कार्यवाह सचिन गव्हाणे, सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग कार्यवाह विठ्ठल सर्जे, धोंडीबा आंबेगावे, अमिष भौड, भरत चाळके, पोपट कसबे आदी पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी रायगड जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. संदीप गायकवाड, महेंद्र पाटेकर, डॉ. भगवान लोखंडे, डॉ. दत्ता कुंटेवाड, उपस्थित होते.



## जनता विद्यालयात घुमला ‘हिंद-दी-चादर’चा जयघोष

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मानवी मूल्यांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहिदी समागमनिमित्ताने खालापूर तालुक्यातील खोपोली येथील जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकाच वेळी सुप्रसिद्ध गायक सरताज सिंग यांनी गायलेले हिंद-दी-चादर हे गीत सादर केले. या ऐतिहासिक उपक्रमाची दखल बेस्ट ऑफ इंडिया रेकॉर्डने घेतली. अप्पर आयुक्त वैशाली इंदानी यांनी आगामी २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी खारघर येथे होणाऱ्या भव्य सोहळ्यास सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे भावनिक आवाहन केले आहे.

यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहीतुले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाळे, उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे गटशिक्षणाधिकारी दीपा परब,खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव किशोर पाटील, विद्यालयाचे प्राचार्य कानिफनाथ गोरे आदि उपस्थित होते. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेली ही मोहीम आता केवळ व्हिडिओ कंटेंट न राहता एक संस्कारांची डिजिटल चळवळ बनली आहे. गुरुबचन सिंह यांनी गुरु तेग बहादूर यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकत मुलांचे प्रबोधन केले.

## भालिवडीत गीत गायन

**अलिबाग :** कर्जत तालुक्यातील भालिवडी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रमशाळेत श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागमनिमित्त सामूहिक गीताचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, अंतर्गत मा. विभागीय आयुक्तांच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आला होता.

## उरणमध्ये फळांना मागणी वाढली

**। उरण । प्रतिनिधी ।**

सद्या सुरू असलेल्या रमजाननिमित्त उरण बाजारपेठेत फळांना मागणी वाढली आहे. रमजान महिन्यात मुस्लिम धर्मीय (रोजा) उपवास पकडतात आणि सायंकाळी फळांचे सेवन करून इफ्तारी करतात. त्यामुळे उरण शहरातील बाजारपेठेत फळांची मागणी वाढल्याने आवक देखील वाढली आहे. सायंकाळी इफ्तार करुन उपवास सोडला जातो. उपवास सोडताना यात रसाळ फळे अधिक असतात. त्यामुळे या दिवसात कलिंगड, आंबा, पपई, खरबूज, अननस, चिकू, द्राक्षे, संत्र अशा रसाळ फळांना अधिक मागणी असते. बाजारपेठेतील सध्या रसाळ फळांचे दर कलिंगड ४० रु. प्रतिकिलो, चिकू १२० रु. किलो,



द्राक्षे १२० रु. किलो, अननस १४० रु. किलो, पपई ७० रु. किलो, खरबूज ५० रु. किलो, संत्र १४० रु. किलो, आंबा ३०० रु. किलो असून रमजाननिमित्त या फळांना नागरिकांकडून मोठी मागणी आहे.

## यूजीसी शॉर्ट टर्म कोर्सचे आयोजन

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व राज्यशास्त्र विभागा च्या वतीने यूजीसी एमएमटीटीसी सेंटर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर यांच्या समवेत सामंजस्य करारा अंतर्गत १५ दिवसीय शॉर्ट टर्म कोर्सचे आयोजन १ मार्च ते १५ मार्च या कालावधीत ऑनलाइन स्वरूपात आयोजित करण्यात आले आहे. कोर्समध्ये देशभरातील विविध विद्यापीठांमध्ये कार्यरत प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. आतापर्यंत १०० पेक्षा अधिक प्राध्यापक व संशोधकांनी या शॉर्ट टर्म कोर्ससाठी नाव नोंदणी केलेली आहे. डॉ. सी. जी. देठे यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्स वर्कचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ तृप्ती थोरात डॉ. भगवान लोखंडे, डॉ. संदीप घोडके हे समन्वयक म्हणून भूमिका बजावणार आहेत. नंदकुमार वेदक, मारुती शिर्के, विठ्ठल जोशी, मंगेश देशमुख, पुरुषोत्तम मुळे, महेंद्र कजबजे, चंद्रकांत रोडे, प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्यांनी कोर्स वर्क उपक्रमाचे कौतुक केले आहे.

## ‘सेवानिवृत्त शिक्षकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष’

**। उरण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा कारभार ढिम्म व वेळकाढू झाला असून या अनागोंदी कारभारामुळे जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांचे विविध अनिर्णित प्रश्न चार दशकाच्या कालावधीत दुर्लक्षित राहिल्याची खंत निवृत्त शिक्षक संघाचे ज्येष्ठ नेते दा. चां. कडू यांनी व्यक्त केली आहे.

उरण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील निवृत्त शिक्षकांचे अनेक प्रश्न ४० वर्षांत सुटू शकले नाहीत. निवृत्त शिक्षकांना न्याय देण्याऐवजी त्यांचे प्रलंबित प्रश्न कसे सुटणार नाहीत, याचीच व्युहरचना रायगड जिल्हा परिषदेच्या आणि उरण पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील अधिकारी वर्ग करीत असल्याने हा जिल्ह्यातील वयोवृद्ध निवृत्त शिक्षकांचा घोर अपमान असल्याचे शिक्षक नेते कडू यांनी स्पष्ट केले आहे.

सेवानिवृत्त शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणी मंजूर करणे, ३१ मार्च १९९५ रोजी सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या पेन्शनची परिगणना करताना मूळ वेतनात २० टक्के ऐवजी ९७ टक्के महागाई भत्ता अधिक करून पेन्शन निश्चित करणे, निवृत्त शिक्षकांची गहाळ झालेली सेवापुस्तके उपलब्ध करणे, दिनांक १/१/१९९६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या पदोन्नती मुख्याध्यापकांना ३२५० रुपये सुधारीत पेन्शन मंजूर करणे, निवडश्रेणी मंजूर केलेल्या शिक्षकांना सुधारीत पेन्शन मंजूर करणे, अनुभवी ट्रेण्ड शिक्षकांना प्रशिक्षित समजून त्यांना वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन मंजूर करणे, बढतीच्या पदाला मानीव वेतन वाढ मंजूर करणे, १९३२ पात्र निवृत्त शिक्षकांना निवडश्रेणी मंजूर करणे आदी निवृत्त शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न असून, ते अनिर्णित ठेवून वयोवृद्ध निवृत्त शिक्षकांना आर्थिक लाभापासून उपेक्षित ठेवण्याचे धोरण जिल्हा परिषद आणि सर्व पंचायत समित्यांचे शिक्षण विभाग राबवित असल्याने शिक्षक नेते कडू यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

खोपटे, तालुका उरण येथे झालेल्या निवृत्त शिक्षक संघाच्या सभेच्यानिमित्ताने कडू यांनी आपल्या भावना व्यक्त करून संघटनेनी आंदोलन केल्याशिवाय शिक्षण विभागाला जाग येणार नाही, असे त्यांनी सांगितले. यावेळी तालुका संघाचे अध्यक्ष अंकुश पाटील, उपाध्यक्ष नामदेव म्हात्रे, सरचिटणीस महादेव ठाकूर, खजिनदार बाळाराम तांडेल, जिल्हा संघाचे सदस्य सदानंद कोळी, नारायण पाटील, गो. सि. पाटील, वर्षा म्हात्रे, राजेश्री भगत आदी उपस्थित होते.

## विघवलीत स्वच्छता अभियान उत्साहात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील विघवली येथे रविवारी (दि.२२) धन्य निरंकार संस्थेच्या सेवाभावी सदस्य व पदाधिकाऱ्यांच्या पुढाकाराने स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले. कडापे व खरवली शाखेच्या माध्यमातून आयोजित या अभियानात अपर्णेश्वर मंदिर व तलाव परिसराची स्वच्छता करण्यात आली. तलावातील शेवाळ, पालापाचोळा व कचरा बाहेर काढून परिसर




स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमातून जल स्वच्छ, मन स्वच्छ हा संदेश देण्यात आला.

अभियानाच्या उद्घाटना प्रसंगी सुधाकर साबळे, शंकर सारंगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी वैष्णव साठे, सुधीर सापळे, अनंत गो. साठे, वसंत साठे, अनिल साठे, सुशांत कोदे व पोलीस पाटील, सपना सारंगे, लता सुर्वे व स्नेहा सालदूर, आश्विनी सालदूर, अरविंद सालदूर, महेंद्र सापळे, गणेश सापळे इंदु कानडे, जगन कानडे उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान शंकर सारंगे यांचा चंदन देऊन गणेश जंगम यांनी सत्कार केला.

## तपोवन आश्रम स्वरांनी निघाला न्हाऊन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेवाळी येथील तपोवन आश्रम येथील साष्टे महाराज यांच्या माध्यमातून श्री दुर्गा माता मंदिराचा १४ वा वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला अजित कडकडे यांच्या अभंगवाणीचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी मैफलीची सुरुवात राग कलावतीने केली. त्यानंतर दुर्गा माता, भगवान विठ्ठल आणि श्री दत्तगुरु यांची अनेक भक्तिगीते सादर करून साष्टे गुरुजी यांच्या शेकडो साधकांना तेथे खिळवून ठेवले. या साधकांमध्ये अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यावेळी विविध प्रकारच्या वनराईने नटलेली झाडे देखील जिवंत झाली असावी असा जिवंतपणा कडकडे यांच्या गीतांमधून अनुभवायला मिळाला. मन शुद्ध झाले या अजरामर गीताने या स्वर मैफलीची सांगता झाली. तपोवनाचे प्रमुख साष्टे गुरुजी यांनी कडकडे तसेच त्यांना मैफलीसाठी साथ देणारे सूर्यप्रकाश, किशोर देसाई, दिनू अण्णा, विवेक दहिवळीकर यांचा सत्कार करण्यात आला.

**जे. एस. एम. महाविद्यालयाचा उपक्रम | विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे**

## सागरी कासव संवर्धन कार्यशाळेचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील जे. एस. एम. महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभाग, आणि उपवनसंरक्षक, कांदळवन प्रतिष्ठान, रायगड यांच्या सहकार्याने सोमवारी (दि.२३) फेब्रुवारी रोजी सकाळी प्राणिशास्त्र विभागात गार्डियन्स ऑफ द शोर-सागरी कासव संवर्धन माहिती कार्यशाळा यशस्वीपणे आयोजित केली होती.




कार्यशाळेत उपसंरक्षक आणि खारफुटी कक्ष रायगड येथील प्रीती सावंत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी महाराष्ट्र किनारपट्टीवरील सागरी कासवांच्या प्रजाती, त्यांचे पर्यावरणीय महत्त्व, अधिवास नाश व समुद्री प्रदूषणामुळे निर्माण झालेले धोके तसेच स्थानिक स्तरावर संवर्धनासाठी समुदायाच्या सहभागाचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली.

कार्यशाळेस एकूण ३७ जण उपस्थित होते. त्यामध्ये १० विद्यार्थी, २२ विद्यार्थीनी आणि ५ प्राध्यापकांनी या उपक्रमात सहभाग घेतला होता.

विद्यार्थ्यांमध्ये सागरी कासव संवर्धनाबाबत जागृतात निर्माण करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. सहभागी विद्यार्थ्यांना माहिती पुस्तिका व किट बॅग देण्यात आल्या, जेणेकरून ते आपल्या कुटुंबीयांमध्ये व मित्रांमध्ये जागरूकता निर्माण करू शकतील.

विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेतला व स्थानिक परिसरातील सागरी कासव संवर्धनाविषयी मौल्यवान ज्ञान प्राप्त केले. अनेक विद्यार्थ्यांनी सागरी कासव संवर्धन व जनजागृती कार्यक्रमात स्वयंसेवक म्हणून कार्य करण्याची तयारी दर्शविली. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची जाणीव व जबाबदारी अधिक दृढ झाली.

कार्यशाळेची प्रस्तावना तसेच आभार प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अद्वैत घाटपांडे यांनी यांनी मानले. कार्यशाळेच्या संचलनासाठी डॉ. सुनील आनंद यांनी मदत केली. कार्यशाळेत डॉ. मीनल पाटील, प्रा. हिमांशू कुलकर्णी आणि प्रा. प्रीतम सातूपे यांनी सक्रिय सहभाग घेतला. सदर कार्यक्रमाचे आयोजन जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास ४) X-Ray साठी मुले ५) मावशी/आयाबाई आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग. ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८
- शिवानी पेटशॉप अलिबाग /चोंढी/ पेण येथे कामासाठी कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे. ९२७२३८३४७६
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ ९२७०५६०४५६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल-जेएनपीटी महामार्ग हा दिवसेंदिवस दुचाकीस्वारांसाठी जिवघेणा ठरत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. रविवारी दुपारी लग्नसमारंभ आटपून घरी परतणाऱ्या एका ३९ वर्षीय विवाहितेला ग्रीट पावडरने भरलेल्या डंपरने चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली. या भीषण अपघातात स्वप्ना भोईर यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे पती मिथुन भोईर गंभीर जखमी झाले. अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून महामार्गावरील वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री.बाळकृष्ण मंगल डांगरे कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - शेलू, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मौजे शेलू | ८४ | ८ | ०.११.१० | ०.२३ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. २५/०२/२०२६

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. फ्लॅट नं.५०४, पाचवा मजला,
गजवक्र रेसिडेन्सी, कचेरी रोड, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

### खुली ई-निविदा आमंत्रण सूचना

प्रधान मुख्य अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे एकल बोली प्रणाली अंतर्गत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी खुल्या निविदा मागवित आहेत. **कामाचे नाव:** वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, रत्नागिरी विभागाच्या कार्यक्षेत्रात वेल्ड्सचे युएसएफडी तपासणी कार्य करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2025-27. अंदाजित किंमत:** ₹60,80,956/- (जीएसटी वगळून).बंद होण्याची दिनांक/वेळ: 18.03.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** चोवीस महिने (मान्सूनसह).मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत। तपशील / सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या। शुद्धीपत्रक / परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र.पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०२/०१/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २४/०२/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा सूचना क्रमांक ०२. दिनांक ०६/०३/२०२६**

प्रति,
मा. सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/ महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक ०६/०३/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या ''आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल'' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०२. दिनांक ०६/०३/२०२६ ची विषयपत्रिका**
**विषय**

**विषय क्रमांक**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २० -''स्थायी समितीची रचना'' यामधील पोटकलम (१) व (२) अन्वये, माहे जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या प्रभागांच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या पालिका सदस्यांपैकी १६ व्यक्तींची स्थायी समिती सदस्य पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ अ अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नियुक्ती करणे.
२. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० पोटकलम (१) अन्वये, महापालिकेने सदर अधिनियमासोबतच्या अनुसूची प्रकरण २ मधील नियम ४ (अ), महिला व बालकल्याण समितीची सदस्य संख्या निश्चित करणे आणि नियम ४ (ब) नुसार या समितीवर महापालिकेने पालिका सदस्यांपैकी निश्चित केलेल्या सदस्यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नियुक्ती करणे.
३. महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ (अ) अन्वये, प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन ७ नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे.

तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.
(मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)

सही/-
महापालिका सचिव कार्यालय
महापालिका भवन,
दि.२४/०२/२०२६

**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव**
**पनवेल महानगरपालिका**

## SRM E-TENDER NOTICE (FOURTH CALL)

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:-** EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/E-Tender-22/ IVth Call/2025-26 Dtd. 25.02.2026 **RFX No. 7000038968** | **Sub :-** Fourth Call for SRM E- Tender for supply of various size of clamp, Connector & Hardware at 220 kV Mahad Substation and EHV Line Maintenance Sub Division Mahad under EHV (O&M) Division Mahad for the year 2025-2026. | Rs. 6,98,972/- (Excluding GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from **25.02.2026 @ 00:00 hrs. to 06.03.2026 @ 23:59 Hrs.** for above tender
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV(O&M) Dn. Mahad**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## सिडको
शहरांचे शिल्पकार

### नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व **श्री. सुबोध सुहास पेठे,** राहणार-११०१, लोढा अरिस्टो, लोढा पॅराडाइस, ऑफ इस्टर्न एक्सप्रेस हाइवे, माजिवाडा, ठाणे व **श्री. अभिजीत पांडुरंग पाटील,** राहणार- ऑफीस नं. ११०५, प्लॉट नं. ८७, शेलटोन क्युबिक्स, से. १५, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. स्मार्ट स्पेस रिअल्टर्स तर्फे भागीदार १) मनीष नरेंद्र मेहता २) भिमेश नरेंद्र मेहता ३) कमरूद्दीन सुभानी पटेल ४) ब्रिजेश व्रजलाल मवानी ५) शाहिद कमरूद्दीन पटेल ६) ऋतू अतुल कपुपारा ७) अक्षय वसंत बागल ८) सुनील रमेश भानुशाली यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| २१६७ | ११.०२.२०२६ | पुष्पक नोड | २८ | ४३ | २१६०.०० चौ. मी | ०१.०१.२०२६ | ०८.०१.२०२६ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
सिडको/जनसंपर्क/५१९/२०२५-२६

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे मालकी ताबे कब्जातील असल्याची ग्वाही विद्यमान मालकाने दिल्यावरून त्यांचे कडून आमचे खरेदीदाराने खालील वर्णनाची जमीन मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे. आणि तश्या आशयाची बोलणी त्यांचा व आमच्या खरेदीदाराच्या दरम्यान झाली आहे. सदरची खाली वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व बोजविरहित असल्याचा भरवसा आमचा अशिलांना विद्यमान मालक **नोफल नाझीमुद्दीन काझी** यांनी दिला आहे. सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणतीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी खालील पत्यावर त्यांची हरकत लेखी नोंदवावी. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे—

| गाव | गट न | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| नारंगी तालुका:- अलिबाग | ९३/१/ब | क्षेत्र ०.३८.५० हेक्टर आर<br>+पोट ०.००.०० हेक्टर आर<br>खराबा ०.३८.५० हेक्टर आर | ९.८१ |
| नारंगी तालुका:- अलिबाग | ९३/१/क | क्षेत्र ०.३१.०० हेक्टर आर<br>+पोट ०.०७.०० हेक्टर आर<br>खराबा ०.३८.०० हेक्टर आर | ६.१२ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचीही वहिवाट दान, गहाण, बक्षीस, लिस, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदि कोणत्याही प्रकारे कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्याची हरकत योग्य त्या कागदोपत्री, पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्यावर सही करणार यांच्याकडे कळवावे, तशी कोणाचीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व बिनजोखीम आहे, असे समजून आमचे खरेदीदार सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागावून आलेली कोणतीही हरकत आमचे खरेदीदारावर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेनी नोंद घ्यावी.

दिनांक - २५/०२/२०२६
(खरेदीदाराचे वकील)
सही /—
ॲड. किमया रविंद्र गोडबोले
४३, ४ था मजला मित्तल कोर्ट, बी विंग, बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, विधान भवन समोर,नरिमन पॉईंट, मुंबई— ४०००२१
संपर्क:— ९०२९६०९२०५

## जाहीर नोटीस

तमाम जनता, वित्तीय संस्था व संबंधित विभागांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

जिल्हा रायगड, तालुका अलिबाग, सजा तलाठी सासवणे, गाव सासवणे येथील गट क्र. २९४ मधील क्षेत्रफळ ०.१२.३०. हे. आर. चौ.मी., पोट खराब ०.००.५० हे.आर.चौ.मी. असे एकूण क्षेत्रफळ ०.१२.८०. हे.आर.चौ.मी. मिळकती बाबत आमचे अशिल श्री.सचिन बाबूराव बडवे यांची आर्थिक गुंतवणुक आहे. शेतमिळकतीबाबतचे मुळ दस्तावेज आमचे अशील श्री.सचिन बाबूराव बडवे यांचे अधिकारात व कस्टडीमध्ये असून सदर शेत शेतमिळकत श्री.सचिन बाबूराव बडवे यांचे ताबे व कब्जेवहिवाटीत आहे. या शेत मिळकतीबाबत इतर कोणतीही व्यक्ती यांनी विक्री, पुनर्विक्री, खरेदी, तारण, गहाण, करार, हस्तांतरण, बोजा निर्माण करणे अथवा कोणत्याही तृतीय पक्षाचा हक्क निर्माण करण्याचा थेट किंवा अप्रत्यक्ष कोणताही व्यवहार करु नये. याउपर कोणीही असा कोणताही व्यवहार केल्यास, तो व्यवहार आमचे अशिल श्री.सचिन बाबूराव बडवे यांच्यावर अथवा सदर शेत मिळकतीवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही व असा व्यवहार कायद्याने अवैध, अमान्य व शून्य समजण्यात येईल, याची तमाम जनता, वित्तीय संस्था व संबंधित विभागाने स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २५/२/२०२६

सही/-
**चैतन्य सुनिल खंदारे**
**ॲडव्होकेट**
**ऑफीस-१३१७ दलामल टॉवर,**
**फ्री, प्रेस जनरल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक मिनल मनोहर कदम, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| बागमळा ता.अलिबाग | ६१ | बागायत ०-१६-२०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकुण ०-१७-५० | ३.८० |

वर नमुद बागायत जमिन मिळकत व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत नागाव हद्दीतील घर क्र. १४६०, क्षेत्र ५५७२ चौ.फुट या मिळकतींबाबतचे

दिनांक : २४/०२/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जन्मतारखेत बदल

मी सौ.वनिता जयवंत म्हात्रे माझी पुर्वश्रमीची जन्मतारिख ०३/०७/१९७० अशी होती. परंतु माझ्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रावर माझी जन्मतारीख ०४/०७/१९७० अशी असून ती बरोबर आहे.
(एक्झीक्युटीव्ह मॅझिस्ट्रेट अलिबाग यांचेसमोर केलेल्या ॲफिडेव्हीट क्र.२५५२०४१७७१२६८६००४२२११०) दिनांक-२४.०२.२०२६ नुसार

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर १९, क्षेत्र ०-९२-१० हे.आर., पो.ख. ०-०७-८० हे.आर., एकूण क्षेत्र ०-९९-९० हे.आर., आकार २३.४४ रू.पै. पैकी दुसरेपक्षी यांच्या मालकीचे क्षेत्र ०-३२-१० हे.आर., पो.ख. ०-०७-८० हे.आर., एकूण क्षेत्र ०-३९-९० हे.आर., आकार ८.१७ रू. पै. ही जमीन मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.सुधाकर दशरथ चव्हाण रा.जी १, ए २०४, श्री निकेतन को. ऑप हौ. सोसायटी, पनवेल माथेरान रोड, सुकापुर, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २४/०२/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या बिनशेतजमिन मिळकतीचे मालक श्री. सुनिल हरिभाऊ पालांडे यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे-लाडीवली, तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड येथील खाली वर्णन केलली बिनशेतजमिन मिळकत पुढील प्रमाणे:-

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकारणी |
|---|---|---|
| ३३/२/ड | ३.७१.०० | ७.४२ |

तरी बिनशेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहीवाट, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख : २५/०२/२०२६

सही /
**ॲड.जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल
शेजारी धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड
४१०१०१, मो.नं. ८३६९२१७३१३

दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, विकसन करार, भाडेकरार, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, भागीदारीचे हक्क, रस्तावहीवाटीचे हक्क, वडीलोपार्जित वारसाहक्क, कौटुंबिक व्यवस्थापनेचे व वाटपाचे हक्क, पोटगीचे हक्क, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा न्यायालयाचे हुकुमनामा, न्यायालयाचे अंतरिम आदेश, ॲवॉर्ड, लिसपेंडेन्सी असल्यास आणि अथवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :-**

| मालकांचे नाव | खाते क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|---|
| शोभा अविनाश म्हात्रे | ४८४ | २६ | ४ ड | ०-१७-०० | ०० | २२ |
| श्री. दिनेश अनंत पाटील<br>श्री. मंगेश अनंत पाटील<br>श्री. रमेश अनंत पाटील<br>लक्ष्मी अनंत पाटील | ४८५ | | | ०-२०-०० | ०० | २५ |
| | | | | एकुण क्षेत्र ०-३७-०० | ०० | ४७ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला,
साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक
(अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड

सही / -
**अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- २५/०२/२०२६
मो. नं. ९९२२३६८१२१

ॲड. शुभम वेळे

## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब क स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज नं. ४८/२०२५
ने.ता. ३०/०३/२०२६

श्रीमती. वैभवी आकाश नायक
(पुर्वाश्रमीची वैभवी प्रफुल्ल भगत)
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी — अर्जदार
रा. सुगंधा हौसिंग सोसायटी,
१०६ पहिला मजला, कर्णिक हॉलजवळ,
पंतनगर, चेंढरे, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१

विरूद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळवितात येते की,

कै.प्रगती प्रफुल्ल भगत ही दि. २५/०९/२०११ रोजी मयत झालेले आहेत. तसेच त्यानंतर अर्जदाराचे वडिल कै.प्रफुल्ल बाळोबा भगत हे दि. २७/०१/२०२२ रोजी मयत झालेले आहेत.

कै.प्रफुल्ल बाळोबा भगत व कै.प्रगती प्रफुल्ल भगत यांनी दिनांक ११/०२/१९९९ रोजी श्री.रमेश मधुकर नाईक व सौ.किरण रमेश नाईक यांच्याकडून दत्तकपत्राने अर्जदार यांना कायदेशीररित्या दत्तक घेतले आहे. सदरचे दत्तकपत्र दस्त हे दिनांक ०३/०१/२००२ रोजी मा. दुय्यम निबंधक सो. अलिबाग यांचेकडे दस्त नं. अलब ४७/२००१ अन्वये नोंदणीकृत केले आहे.

कै. प्रफुल्ल बाळोबा भगत यांनी देना बँक शाखा रेवदंडा येथे समृद्धी जमा पावती क्र.०८६४६७६३ ही रक्कम रू.१,३७,१६३/- दिनांक ३०/०८/२०२२ पर्यंत व्याजासह जमा रक्कम

सबब वर वर्णन केलेल्या जंगम मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होऊन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीप्रमाणे हरकत दाखल केल्या नाही. तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखल प्रदान करण्यात येईल नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २५/०२/२०२६

सही/- **क.लिपीक** **दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग**
सही/- **सहा.अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग**

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.१३७९/२०२६

श्रीम.हेमा लहानु घोगरकर, रा.कवळोशी कातकरवाडी
पो. कळंब, ता. सुधागड जि.रायगड — वादी

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कळंब
ता. सुधागड.जि.रायगड — प्रतिवादी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्रीम. हेमा लहानु घोगरकर, रा.कवळोशी कातकरवाडी पो.कळंब ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचे स्वतःचा जन्म दि.१२/०६/१९९८ रोजी मौजे कवळोशी कातकरवाडी पो.कळंब ता.सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर हेमा लहानु घोगरकर यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- ११/०२/२०२६

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिन्यांचे नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे- वाकस, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉं. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| गंगाधर कारभारी जाधव | ५२ | ६/अ | १-०५-०० क्षेत्रापैकी खरेदी देणार यांचे मालकीचे ०-६२-०० गुंठे क्षेत्र मिळकतीपैकी ०-१७-७९ गुंठे क्षेत्र मिळकत | ०-७५ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २४/०२/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार १) श्रीम.लक्ष्मी चंद्रकांत कोंडगुली २) श्री. नवीन चंद्रकांत कोंडगुली यांनी मौजे बोर्ले, ता कर्जत, जि रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, व त्या मिळकतीचे मालक १) श्री मुर्गन थेवर २) श्रीम रिना चिरायत पॉल यांच्याकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे - बोर्ले,तालुका-कर्जत, जिल्हा - रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्र(चौ.मी) | आकार(रुपये-पैसे) |
|---|---|---|---|
| सर्व्हे नं ४३ | ३४ | २.८२ | २८.२० |

वरील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकारार, गहाणखत, फरोक्त दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारात कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणतीही हरकत न घेतल्यास/आल्यास वरील मिळकत या बोजारहीत व निर्वेध आहेत असे समजून वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार जमीन मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २३/०२/२०२६

**ॲड. वैभव अशोक शिंदे**
बी.एस.सी.एल.एल.बी
पत्ता:- फ्लॅट नं १०, श्री साई सावली को.
ऑप.हौस, सो, कर्जत कोर्ट जवळ, कर्जत
ता.कर्जत. जि.रायगड, पिन ४१०१०१.
मो.७७४४८५१४६९/७०५८८५१२२१

## जाहिरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

नारायण रामदास पाटील,
रा.मसद बु.ता. पेण,जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत मसद बु. — सामनेवाला
ता.पेण,जि.रायगड

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा राजन नारायण पाटील यांचा जन्म दिनांक १३/०९/१९८५ रोजी मौजे मसद बु. ता.पेण, जि.रायगड येथे झाला असून त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मसद बु. ता.पेण, जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे, कोणाचेही काही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे. कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- पेण
दि. २५/०२/२०२६

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

# वेस्ट इंडिजकडून झिम्बाब्वेचा पराभव

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

टी-२० विश्वचषकाच्या साखळी फेरीत धमाकेदार कामगिरी करणाऱ्या झिम्बाब्वेला सुपर-८च्या पहिल्याच सामन्यात वेस्ट इंडिजकडून मोठा पराभव पत्करावा लागला. सोमवारी (दि.२३) पार पडलेल्या या सामन्यात शिमरॉन हेटमायरला दोनवेळा जिवदान भेटले. या संधीचा फायदा घेत त्याने क्रिकेटची पंढरी असलेले मुंबईतील वानखेडे स्टेडियम गाजवले. यावेळी वेस्ट इंडिजने झिम्बाब्वेचा तब्बल १०७ धावांनी पराभव केला असून वानखेडे स्टेडियमवरील हा त्यांचा टी-२० विश्वचषकातील सलग ५वा विजय ठरला आहे.




झिम्बाब्वेचा कर्णधार सिंकदर रजाने नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिजचा पहिलाच गडी तिसऱ्या षटकात बाद झाला. ब्रेंडन किंग ९ धावा करत बाद झाला. त्यामुळे झिम्बाब्वेने गोलंदाजीत चांगली सुरूवात केली. त्यानंतर शिमरन हेटमायर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. तो ९ धावांवरच असताना ताशिंगा मुसेकिवा याने हेटमायरची कॅच सोडली. तेव्हा वेस्ट इंडिजने केवळ २६ धावा केल्या होत्या. त्यानंतर शिमरॉन हेटमायरने मिळालेल्या संधीचा चांगलाच फायदा उचलला. त्याने १९ चेंडूतच ५० धावा ठोकल्या. त्यामुळे त्या टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात वेस्ट इंडिजकडून सर्वात जलद धावा ठरल्या. त्यानंतर पुन्हा एकदा मुसेकिवाने हेटमायरचा झेल सोडला. त्यावेळी हेटमायर ७० धावांवर होता. हेटमायरने ३४ चेंडूत ७ षटकार आणि ७ चौकार मारत ८५ धावा केल्या. तसेच, रोवमन पॉवेलने ३५ चेंडूत ५९ धावांची खेळी केली. त्यामुळे वेस्ट इंडिजने झिम्बाब्वेसमोर २० षटकात ६ बाद २५४ धावांचे मोठे लक्ष ठेवता आले. झिम्बाब्वेकडून रिचर्ड एनगारावा आणि ब्लेसिंग मुझराबनी यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

त्यानंतर लक्ष्याचा पाठलाग करण्यास उतरलेल्या झिम्बाब्वेचा डाव १७.४ षटकात सर्वबाद १४७ धावसंख्येवरच संपुष्टात आला. झिम्बाब्वेकडून ब्रॅड इवान्सने २१ चेंडूत ४३ धावा केल्या. परंतु, बाकी कोणाला खास काही करता आले नाही. तरी झिम्बाब्वेने १०३ धावांवरच ९ गडी गमावले होते. मात्र, शेवटच्या बळीसाठी रिचर्ड एनगारा आणि ब्रॅड इवान्स यांच्यात १९ चेंडूत ४४ धावांची भागीदारी झाली. त्यामुळे झिम्बाब्वेला १४७ धावांपर्यंत पोहोचता आले. जर हेटमारयचा तो कॅच पकडला असता तर सामन्याचा निकाल काही वेगळाच असता. आता झिम्बाब्वेचा पुढील सामना गुरूवारी (दि.२६) भारताविरुद्ध आहे.



## सलग पाच विजयांचा विक्रम

वेस्ट इंडिजने आत्तापर्यंत २०१६ ते २०२६ या दरम्यान टी-२० विश्वचषकामध्ये वानखेडेवर ५ सामने खेळले आहेत. या पाचही सामन्यात त्यांनी विजय मिळवला आहे. म्हणजेच त्यांची या मैदानावरची विजयाची टक्केवारी १०० टक्के आहे. वानखेडेवर असा विक्रम कोणालाच करता आलेला नाही. इंग्लंडने येथे टी-२० विश्वचषकात ४ सामने खेळले आहेत. परंतु, त्यांना दोनच सामने जिंकले आहेत. भारताने या स्टेडियमवर टी-२० विश्वचषकात केवळ २ सामने खेळले असून एक सामना जिंकला आहे, तर एक पराभूत झाला आहे. पराभूत झालेला सामन्यातही वेस्ट इंडिजविरुद्ध २०१६चा टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत झाला होता.

---

विनायक दळवी

# शिमरॉन हेटमायरचा कॅरिबियन कॅलिप्सो

वेस्टइंडीजचा धडाकेबाज फलंदाज शिमरॉन हेटमायर हा भारतीयांसाठी अपरिचित नाही. वेस्टइंडीजला १९ वर्षाखालील विश्वचषक स्पर्धा जिंकून दिल्यापासून, म्हणजे गेल्या दहा-बारा वर्षांपासून तो सतत फलंदाजी आणि गोलंदाजीसाठी चर्चेत आहे. सोमवारी मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर हेटमायर नावाचं तुफान आलं होतं. त्याने ३४ चेंडूत ८५ धावा ठोकून वेस्टइंडीजला सुपरहिट स्पर्धेत स्फोटक विजय मिळवून दिला.

शिमरॉन हेटमायर हा कॅरिबियन बेटांवरचा क्रिकेटचा सुगंध आणि तडाखे बंद फलंदाजी किंवा गोलंदाजी घेऊन मैदानात उतरतो. त्याचा जन्म गयानाचा. त्यामुळे त्याच्या डीएनएमध्ये कॅलिप्सो क्रिकेट पूर्णपणे मुरलेलं आहे. वानखेडे स्टेडियमवर त्यांनं पहिलाच चेंडू क्लिक करून स्टॅन्डमध्ये धाडला. त्यावेळी उपस्थित प्रेक्षकांना, आज काहीतरी वेगळं पाहायला मिळेल याचा अंदाज आला होता. त्याच्या फ्लिकच्या फटक्यामध्ये नजाकत होती, तर हुक आणि पूलच्या फटक्यांमध्ये ताकद होती. क्षेत्ररक्षकांच्या गॅपमधून चेंडू काढतानाची त्याची नजाकत वाखाण्याजोगी होती. तो खरंतर मधल्या फळीत खेळतो. मात्र, वेस्टइंडीजने यावेळी त्याला चक्क तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याची बढती दिली होती. विक्स, वॉरेल, वॉल्कॉटपासून रोहन कन्हाय, सर गारफील्ड सोबर्स आणि अलीकडच्या सर व्ही.व्ही.एन. रिचर्ड्स, लॉईड, ग्रीनिचपर्यंत फलंदाज कॅरिबियन स्टाईलच्या क्रिकेटची मेजवानीच क्रिकेट रसिकांसाठी देत होते. मात्र, अलीकडच्या काळात, किंबहुना गेल्या दोन दशकांमध्ये, कॅरिबियन क्रिकेटचा हा सुगंध फारसा अनुभवायला मिळत नव्हता. सोमवारी वानखेडे स्टेडियमवर आलेले प्रेक्षक मात्र सुदैवी होते. हेटमायरची 'कॅरिबियन स्टाईल'ची फलंदाजी पाहण्याचा एक दुर्मिळ योग जुळून आला होता. ७ षटकार मैदानाच्या सर्व भागांमध्ये विखुरलेले होते. त्याने कोणावरही अन्याय केला नाही. प्रत्येकासाठी हव्या त्या स्टॅन्डमध्ये चेंडू पाठवून दिला. झिम्बाब्वेची गोलंदाजी सुमार दर्जाची नव्हती. तरीदेखील मिळालेल्या जीवनाचा पुरेपूर लाभ उठवीत हेटमायरने कॅरिबियन फलंदाजीचा सुगंध काय असतो, ते दाखवून दिले. शिमरॉन हेटमायर त्याच्या आक्रमक स्ट्रोकप्लेसाठी जितका प्रसिद्ध आहे, तितकाच तो त्याच्या केशभूषेकडे ही लोकांचं लक्ष वेधून घेत असतो. भारतात त्याला त्याच्या या हेअर स्टाईलमुळे लोकांकडून प्रतिसादही चांगला मिळतो. त्यामुळे भारतात राहणं त्याला आवडतं. आयपीएलसाठी तो जेव्हा जेव्हा भारतात येतो त्यावेळी तो खुश असतो. आता तर त्याला आपल्या देशाची, वेस्टइंडीज संघाची सेवा करण्याची संधी या विश्वचषक स्पर्धेमुळे मिळाली आहे. त्याचा तो पुरेपूर लाभ उठवत आहे.

शिमरॉन हेटमायरला आयपीएल २०१९ च्या आधी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने ४.२ कोटी रुपयांना संघात घेतले होते. मागील वर्षी सीपीएलमध्ये तो ४०च्या सरासरीने आणि १४८.१४च्या स्ट्राईक रेटने ४४० धावा करून गयाना अमेझॉन वॉरियर्सचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरला होता. दिल्ली कॅपिटल्समध्ये जाण्यापूर्वी हेटमायरने २०१९ मध्ये आरसीबीसाठी फक्त ५ सामने खेळला. २०२० मध्ये त्याची बॅट शांत राहिली. परंतु, २०२१ मध्ये त्याने १६८.०५च्या स्ट्राईक रेटने २४२ धावा केल्या. २०२२ साली राजस्थान रॉयल्समध्ये हेटमायरचा तिसरा आयपीएल संघ बनला, जेव्हा त्यांनी त्याला ८.५ कोटी रुपये दिले. त्याने ३ हंगामात आरआरसाठी ७२६ धावा केल्या आणि आयपीएल २०२५ च्या मेगा लिलावापूर्वी त्यांनी त्याला ११ कोटी रुपयांना कायम ठेवले गेले. मर्यादित षटकांच्या प्रामुख्याने टी-२० षटकांच्या सामन्याचा खऱ्या अर्थाने तो हिरा आहे. त्याने वानखेडे स्टेडियमवर ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. वानखेडे स्टेडियमवर वेगवान गोलंदाजांसाठी प्रसिद्ध असलेल्या वेस्ट इंडियन संघाच्या दोन फिरके गोलंदाजांनी मिळून एकूण ७ बळी घेतले. ही गोष्ट भारतीय संघाला काळजीत टाकणारी आहे. कारण आफ्रिकेविरुद्ध पहिला सामना गमावल्यानंतर, भारताला वेस्टइंडीज विरुद्धचा सामना जिंकावाच लागेल. त्यावेळी फिरकी गोलंदाजांचा सामना करणे हे भारतीयांसाठी एक मोठेच आव्हान असेल.

---

# अंतिम सामन्यात शुभम पुंडीरचे शतक

## जम्मू-काश्मीरचा पहिला डाव २५० पार

**। हुबळी । वृत्तसंस्था ।**

भारतीय स्थानिक क्रिकेटमधील मानाच्या स्पर्धांमधील रणजी चषक या स्पर्धेच्या २०२५-२६ हंगामाचा अंतिम सामना कर्नाटक विरुद्ध जम्मू-काश्मीर यांच्यात सुरू आहे. हा सामना दि.२४ ते २८ फेब्रुवारी दरम्यान हुबळीमध्ये खेळला जात आहे. यावेळी यावेर हसन, शुभम पुंडीर आणि अब्दुल समाद यांनी उल्लेखनीय खेळी केली.

जम्मू-काश्मीरचा कर्णधार पारस डोग्राने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या सामन्यात जम्मू-काश्मीरने २५०च्या वर धावा केल्या असून दोन गडी बाद झाले आहेत. त्यांचा पहिला गडी १८ धावांवर बाद झाला. त्यानंतर यावेर आणि शुभम यांनी संयमी खेळ करत १३९ धावांची भागीदारी केली. यावेर ८८ धावा करत बाद झाला. त्यांनतर शुभमने अब्दुलसोबत डाव सांभाळला. तसेच, पारस रिटायर्ड-हर्ट झाला. त्यांनतर शुभम आणि अब्दुलने शतकी भागीदारी केली. दोघेही



खेळपट्टीवर उपस्थित असून पहिल्या दिवसाचा खेळ संपला आहे. शुभम ११७ धावा आणि अब्दुल ५२ धावांवर नाबाद आहेत. त्यामुळे जम्मू-काश्मीरचा पहिला डाव २ बाद २८४ धावा असा झाला आहे. तसेच, शुभमचे हे शतक खास राहिले कारण त्याने एकेरी-दुहेरी धाव न घेता थेट षटकार मारत पूर्ण केले. तसेच, तो रणजी चषकाच्या अंतिम फेरीत शतक करणारा जम्मू-काश्मीरचा पहिला फलंदाज ठरला आहे.

---



# जय बजरंग रोह्याचा तृतीय क्रमांक

**। खांब । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत जय बजरंग रोहा संघाने उल्लेखनीय कामगिरी करत तिसरा क्रमांक पटकावला आहे. जिल्हाभरातील बलाढ्य संघांच्या सहभागात झालेल्या या स्पर्धेत संघाने सुरुवातीपासूनच जिद्द, शिस्त व लढाऊ खेळ सादर करत अंतिम चारमध्ये प्रवेश मिळवला. या विजयाने क्रीडा प्रकारात रोह्याचा मान अधिक उंचावला असल्याची प्रतिक्रिया क्रीडाप्रेमी नागरिकांकडून व्यक्त केली जाऊ लागली आहे.

स्पर्धेतील विविध फेऱ्यांमध्ये जय बजरंग रोहा संघाने प्रभावी बचाव आणि अचूक चढाया करत प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व राखले. निर्णायकसामन्यांतखेळाडूंनीसंयम राखत उत्तम समन्वय दाखवला व रोहा तालुक्याचे नाव जिल्ह्यात

## ■ अचूक लढाया करत वर्चस्व

उंचावले. या यशामध्ये जय बजरंग रोहाचा अष्टपैलू खेळाडू राकेश गायकवाड व राज मोरे यांच्या सर्वोत्कृष्ट खेळाचा मोलाचा वाटा राहिला. त्यांच्या प्रभावी खेळामुळे संघाला महत्त्वाच्या क्षणी आघाडी मिळाली. प्रशिक्षक अमर सलागरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व खेळाडूंनी संघभावना जपत शिस्तबद्ध खेळ करत उत्कृष्ट कामगिरी केली. रोहा तालुका कबड्डी इतिहासात प्रथमच एखाद्या संघाने या स्तरावर पोहोचून पदक जिंकण्याचा मान मिळवला असून ही संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या यशाबद्दल खेळाडू, प्रशिक्षक, पदाधिकारी व समर्थकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

# अलिबागमध्ये स्नुकर स्पर्धा उत्साहात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग मधिी 'द प्रो ब्रेकरर्स' या संघटनेमार्फ दि.२१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान स्नुकर स्पर्धे चे आयोजन करण्यात आले हाते. यामध्ये अलिबाग परिसरातील ५० त ६० खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये पेझारी येथील साहिल समजीसकर याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर श्रीबागमधील सौरभ चाळके याचा द्वितीय क्रमांक, वरसोली येथील सागर देशमुख याने तृतीय क्रमांक आणि अलिबागमधील सर्वेश बंद्री याने चौथा क्रमांक पटकविला आहे. या स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य पतसंस्था कमळ नागरी सहकारी पतसंस्थे तर्फे प्रथम



क्रमांकाचे पारितोषिक, द प्रो ब्रेकरर्स क्लब तर्फे द्वितीय व चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक, तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक कै. दशरथ वाघमारे यांच्या स्मरणार्थ देण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी द प्रो ब्रेकरर्स क्लबचा उत्साही सभासदांनी मोलाचा सहभाग नोंदविला.

---

# कर्णधार हरमनप्रीत कौर दुखापतग्रस्त

**नवी दिल्ली** : ऑस्ट्रेलिया विरूद्ध मंगळवारी (दि.२४) खेळल्या गेलेल्या मालिकेत भारताची सुरूवात निराशाजनक झाली आहे. हा पराभव एक झटकाच असून भारताला आणखी एक मोठा धक्का बसला आहे.



भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौर सामन्यावेळी दुखापतग्रस्त झाली. या सामन्यात हरमनप्रीतने अर्धशतकी खेळी केली. यावेळी तिच्या गुडघ्याला दुखापत झाली. त्यामुळे दुसऱ्या डावात उप-कर्णधार स्मृती मानधनाने संघाचे नेतृत्व केले.

---

# अंतिम सामन्याच्या तिकिट वीक्रिला सुरुवात

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।**

टी-२० विश्वचषकातील उपांत्य फेरी आणि अंतिम सामन्याच्या तिकिटांच्या वीक्रिला सुरुवात झाली आहे. चाहते ४ आणि ५ मार्च रोजी होणाऱ्या उपांत्य फेरीसाठी तसेच ८ मार्च रोजी होणाऱ्या अंतिम सामन्याचे तिकीट बूक करू शकत आहेत. पहिला उपांत्य सामन्यासाठी कोलंबोचे आर प्रेमदासा स्टेडियम आणि कोलकात्याचे इडन गार्डन्स, असे दोन पर्याय ठेवले आहेत. दुसरा उपांत्य सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. पाकिस्तान उपांत्य फेरीत पोहोचला, तर ते ४ मार्च रोजी कोलंबो येथे होणाऱ्या उपांत्य फेरी १ मध्ये खेळतील. पाकिस्तान उपांत्य फेरीत पोहोचला नाही, परंतु श्रीलंका पात्र ठरला आणि भारताव्यतिरिक्त तो अन्य संघाशी झाला, तर श्रीलंका कोलंबो येथे होणाऱ्या उपांत्य फेरीमध्ये खेळेल. भारत आणि श्रीलंका यांच्यात हा सामना झाल्यास तो कोलकाता येथे खेळवला जाईल. तसेच, पाकिस्तान अंतिम फेरीत पोहोचला तर तो कोलंबोमध्ये खेळवला जाईल; अन्यथा, फायनल अहमदाबादमध्ये होईल.

---

# अजिंक्यपद स्पर्धेचे बडोद्यात आयोजन

**मुंबई** : वरिष्ठ आंतरराष्ट्रीय पुरुष कबड्डी अजिंक्यपद स्पर्धा दि.२४ ते २७ फेब्रुवारीदरम्यान बडोद्यातील समा इंडोर कॉम्प्लेक्समध्ये पार पडणार आहे. या स्पर्धेत देशभरातून ३१ संघ विजेतेपदासाठी जोरदार टक्कर देणार असून सुमारे ४०० खेळाडू सहभागी होणार आहेत. तसेच, या स्पर्धेत अनुभवी खेळाडूंसह नवोदित ताऱ्यांनाही आपली चमक दाखविण्याची संधी मिळणार आहे. त्याचबरोबर प्रो कबड्डी लीगमध्ये दमदार कामगिरी करणारे खेळाडूही या स्पर्धेत उतरणार आहेत.

---

# 'भारताचा पराभव बेफिकिरीचा परिणाम'

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ७६ धावांचा दणका बसल्यानंतर दिग्गज सुनील गावसकर यांनी भारताच्या फलंदाजांना थेट आरसा दाखवला आहे. टी-२० म्हणजे प्रत्येक चेंडू ठोकायचाच आणि सीमारेषेबाहेर पाठवायचा खेळ नाही. परिस्थिती ओळखा, अहंकार सोडा, असा सल्ला त्यांनी दिला. दक्षिण आफ्रिकेची अवस्था ३ बाद २० अशी बिकट होती; परंतु, डेवाल्ड ब्रेविस आणि डेव्हिड मिलर यांनी ९७ धावांची भागीदारी रचत डाव सावरला. संयम, परिस्थितीचे भान आणि योग्य फटके ही त्यांची गुरुकिल्ली होती. अखेरीस ७ बाद १८७ ही लढाऊ धावसंख्या उभी राहिली. भारताने मात्र त्यातून काहीच शिकले नाही. १८.५ षटकांत १११ धावांत खेळ खल्लास. हा पराभव नव्हे, तर बेफिकिरीचा परिणाम होता, असेही गावसकरांनी ठणकावून सांगितले.


---

# विश्वचषकादरम्यान नवीन मालिकेची घोषणा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसीच्या टी-२० विश्वचषकाचा थरार सध्या शिगेला पोहोचला आहे. या स्पर्धेच्या धामधुमीतच अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने एका नवीन मालिकेची घोषणा केली आहे. अफगाणिस्तान आणि श्रीलंका यांच्यात ३ टी-२० आणि ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे.

क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच अफगाणिस्तान संघ श्रीलंकेचे यजमानपद



भूषवणार आहे. या मालिकेतील सर्व सामने शारजाह आणि दुबई येथे खेळवले जाणार आहेत. मालिकेची सुरुवात १३ मार्चपासून होणार असून दौऱ्याचा शेवटचा सामना २५ मार्च रोजी खेळला जाणार आहे. श्रीलंकेविरुद्धच्या या मालिकेची माहिती अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली आहे. श्रीलंका आणि अफगाणिस्तान यांच्यातील ही दुसरी द्विपक्षीय मालिका असणार आहे. यापूर्वी २०२४ मध्ये टी-२० फॉरमॅटमध्ये दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या दौऱ्यावर आधी ३ सामन्यांची टी-२० मालिका होणार आहे, तर २० मार्चपासून एकदिवसीय मालिकेला सुरुवात होणार आहे. अद्याप या मालिकेसाठी संघांची घोषणा करण्यात आलेली नाही.

---

## ऑस्ट्रोलियाची मालिकेत १-० ने आघाडी | भारतीय संघाची पराभवाने सुरूवात

# महिला कांगारूंची विजयी सलामी

**। ब्रिस्बेन । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला ब्रिगेडने ३ सामन्यांची टी-२० मालिका २-१ अशा फरकाने आपल्या नावावर केली. त्यामुळे चाहत्यांसह खेळाडूंमध्ये उत्साह होता. मात्र, भारताच्या महिला संघाने मंगळवारी (दि.२४) पार पडलेल्या एकदिवसीय मालिकेत विजयी सुरुवात करण्यात अपयशी ठरली. यावेळी ऑस्ट्रोलिया महिला संघाने विजयी सलामी दिली असून भारतीय महिला संघाला पराभवाचे पाणी पाजले. त्यामुळे ऑस्ट्रोलिया संघाने मालिकेत १-० ने आघाडी मिळवली आहे.



भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, कर्णधार हरमनप्रीत कौर, उपकर्णधार स्मृती मंधाना, काश्वी गौतम आणि ऋचा घोष या चौघींनाच दुहेरी आकडा गाठता आला. त्यातही हरमनप्रीत आणि स्मृती या दोघींनी अर्धशतक झळकावले. मात्र, हरमनप्रीत आणि स्मृती या दोघींनाही अर्धशतकी खेळीला मोठ्या आकड्यात बदलता आले नाही. यावेळी स्मृतीने सर्वाधिक ५८ धावा केल्या. हरमनप्रीतने ५३ धावांची खेळी केली. काश्वी गौतम हीने ४३ धावांचे योगदान दिले. तर, ऋचा घोष हीने ४३ धावा केल्या. प्रतिका रावल आली तशीच शुन्यावर बाद होऊन गेली. त्यांनतर शफाली वर्मा ४, जेमीमाह रॉड्रिग्स ८ आणि दीप्ती शर्मा हीने २ धावांचे योगदान दिले. त्यामुळे भारताचा डाव ४८.३ षटकांत २१४ धावांवर आटोपला.

त्यांनंतर भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रोलिया संघाची कर्णधार एलिसा हीली आणि फोबी लिचफिल्ड या सलामी जोडीने अर्धशतकी भागीदारी केली. मात्र, भारताने ५५ धावांवर ही जोडी फोडली. यावेळी फोबीने ३२ धावा केल्या. त्यानंतर दुसऱ्याच चेंडूवर जॉर्जिया वॉल ही शुन्यावर बाद झाली. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने तिसऱ्या आणि चौथ्या बळीसाठी अर्धशतकी भागीदारी करुन विजय निश्चित केला. यावेळी कर्णधार हीलीने ५० धावा केल्या. तसेच, बेथ मुनी हीने सर्वाधिक ७६ धावा केल्या. तर, अनाबेल सदरलँड आणि एश्लेघ गार्डनर या दोघींनी ऑस्ट्रेलियाला विजयापर्यंत पोहचवले. अन्नाबेल हीने नाबाद ४८ धावा केल्या. तर, गार्डनर ५ धावांवर नाबाद राहिली. त्यामुळे ऑस्टोलिया संघ ३८.२ षटकांत ६ गडी राखून २१७ धावा करत विजय मिळवला.

---

# तेंडुलकरच्या धारधार गोलंदाजीची झलक

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

अर्जुन तेंडुलकरने इंडियन प्रीमिअर लीग २०२६ च्या तयारीला सुरुवात केली आहे. नवी मुंबईत सुरू असलेल्या डीवाय पाटील टी-२० स्पर्धेत अर्जुनने त्याच्या धारधार गोलंदाजीची झलक दाखवली. त्याने स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी यशस्वी जैस्वालचा मोठा भाऊ तेजस्वीचा बळी घेतला आहे. २८ वर्षीय तेजस्वीने २०२४-२५ मध्ये देशांतर्गत क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि तो त्रिपुरा संघाकडून खेळतो. अर्जुनने या फलंदाजाला २७ धावांवर झेलबाद केले. अर्जुनने टाकलेला चेंडू तेजस्वीने उंच टोलावला, परंतु तो सीमापार जाऊ शकला नाही. तेजस्वीने ५ प्रथम श्रेणी, ८ लिस्ट ए आणि ४ टी-२० सामने खेळले आहेत. अर्जुन तेंडुलकर आयपीएल २०२६ मध्ये लखनौ सुपर जायंट्स कडून खेळणार आहे. तो आयपीएल २०२१ ते २०२५ पर्यंत मुंबई इंडियन्सचा सदस्य होता. डी वाय पाटील टी-२० स्पर्धेत त्याने डी वाय पाटील ब्लू संघाचे प्रतिनिधित्व करताना ३४ धावांत ३ बळी घेतले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)